




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार दि. ११ जुलै २०२६

आवृती- पुणे, अहील्यानगर, मुबंई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २११ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com







# २०१९ मधील लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; 'भाडे के टट्टू'वर आक्षेप घेणाऱ्यांना संबोधले 'सुपारीबाज'



**मुंबई : राज्यातील बळीराजाला आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची व्याप्ती वाढवत, २०१९ मधील 'महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजने'च्या सुमारे २ लाख लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. याशिवाय योजनेतील २६-२७ चा नियमही वगळण्यात येणार असल्याने राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले, तर दुसरीकडे पायाभूत सुविधांच्या कामांवरून खोट्या बातम्या पसरवून 'मिसिंग लिंक'च्या पुलाबाबत चिखलफेक करणाऱ्या विरोधकांना 'सुपारीबाज' आणि 'भाटक गदर्भ' (भाडोत्री गाढव) म्हणत प्रतिटोला लगावला.**

विधानसभेत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'वर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे सर्व आरोप आकडेवारीनिशी खोडून काढले. ते म्हणाले, या योजनेतून केवळ १२ हजार कोटींचाच लाभ मिळेल आणि ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल, हा विरोधकांचा दावा पूर्णपणे खोटा आहे. ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे कवच देणारी आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. मविआच्या काळात महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजनेत २ लाखांपेक्षा एक रुपया जरी जास्त थकबाकी असली तरी शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही. मात्र, आमच्या सरकारने २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेत सामावून घेऊन २ लाखांपर्यंतची कर्जमाफी दिली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत, महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील लाभधारकांना आधी ५० हजारांचा लाभ देण्याचे निश्चित झाले होते. मात्र, आमदार रणधीर सावरकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जनभावना मांडली. त्या पार्श्वभूमीवर, जनभावनेचा आदर करत २०१९ मधील या २ लाख शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. यासोबतच दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी देखील महायुती सरकार शेतकऱ्यांना देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या पुलाला एकही तडा (Cafe) गेला नसताना ७ हजार कोटी पाण्यात गेल्याच्या खोट्या बातम्या पेरून महाराष्ट्राचा अपमान केला जात असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मी परवा हिंदीत 'भाडे के टट्टू' हा शब्द प्रयोग केला, तो ज्यांना समजायला हवा होता त्यांना बरोबर समजला. पण काहींना उगाच मिरची लागली. ठीक आहे, मी तो शब्द मागे घेतो आणि त्याऐवजी 'भाटक गदर्भ' हा शब्द वापरतो. कोणाला तरीही समजले नसेल, तर सरळ 'सुपारीबाज' म्हणतो, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे नाव न घेता, ते राजकारणात आहेत याचा आनंद आहे, ते जर मिमिक्री क्षेत्रात गेले असते तर एकाही स्टँडअप कॉमेडियनला मार्केट राहिले नसते, असा टोलाही त्यांनी लगावला. राज्यातील गुन्हेगारीचा दर घसरला

सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रति एक लाख लोकसंख्येच्या आधारावर क्रॉइम रेट मोजला जातो. या निकषानुसार गुन्हेगारीच्या दरात महाराष्ट्र देशात ७ व्या, महिलांवरील अत्याचारात ९ व्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये देशात १७ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे महाराष्ट्र सुरक्षित राज्य आहे. राज्यातील 'अपराध सिद्धीचा दर' २००८ मधील ९.४ टक्क्यांवरून ५२.६ टक्क्यांवर पोहोचला असून नवीन कायद्यांमुळे तो ८० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. बेपत्ता महिलांपैकी ९३ टक्के (२ लाख १७ हजार ७५८) महिलांचा शोध घेऊन त्यांना घरी सुखरूप पोहोचवले असून, यात ४६ टक्के केसेस या प्रेमप्रकरणाच्या तर २० टक्के कौटुंबिक वादाच्या असल्याचे विश्लेषणातून समोर आल्याचे ते म्हणाले. पोलीस दल बळकट होणार


पोलीस दलाच्या आधुनीकीकरणासाठी केंद्राने ७३३ कोटींचा (६० टक्के केंद्र आणि ४० टक्के राज्य) निधी मंजूर केला असून आगामी ६ महिन्यांत सागरी सुरक्षा, ड्रग्ज तस्करी रोखणे आणि सायबर गुन्हेगारीविरोधात अत्याधुनिक शस्त्रे, ड्रोन, स्पीड बोट व हावरक्राफ्ट खरेदी केले जातील. पोलिसांच्या घरांसाठी १ हजार ७०० कोटींची 'डीजी लोन' सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. आमदार कालिदास कोळंबकर यांनी उपस्थित केलेल्या पोलिसांच्या मालकी घरांच्या प्रश्नावर, पुढील ७ दिवसांत उच्चस्तरीय समिती नेमली जाईल आणि ३ महिन्यांत यावर अंतिम अहवाल मागवून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर आणणारच

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सीआयडी आणि 'एएआयबी' यंत्रणांकडून दोन प्रकारे तपास सुरू आहे. 'एएआयबी'चा अंतिम अहवाल साधारणतः जानेवारी २०२७ पूर्वी येईल. केंद्र सरकारच्या विनंतीनुसार यात परदेशी तज्ज्ञांची मदत घेतली जात असून, ब्लॅक बॉक्समधील संपूर्ण डेटा डाऊनलोड झाला आहे. पायलट सुमीत कपूर यांच्या बँक खात्यांची, शेअर्सची तपासणी केली असता काहीही संशयास्पद आढळलेले नाही. दादांच्या पुण्यतिथीपूर्वी हा अहवाल येईल आणि त्यातील सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. स्मार्ट मीटरच्या तक्रारींमध्ये तथ्य नाही

राज्यात महावितरणच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या १ कोटी २३ लाख 'स्मार्ट मीटर'च्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची आकडेवारी दिली. एकूण १ कोटी ग्राहकांपैकी ३ लाख ९२ हजार ग्राहकांकडून तक्रारी आल्या होत्या. त्याची खातरजमा करण्यासाठी महावितरणने तपासणी केली असता, केवळ २१० तक्रारींमध्येच तथ्य आढळल्याचे स्पष्ट करत त्यांनी विरोधकांचा दावा खोडून काढला.

# संत निरंकारी मिशन मार्फत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापक स्वच्छता अभियान






आळंदी (पुणे) (समर्थ गांवकरी)

आषाढी वारीनिमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत संत निरंकारी मिशनच्या माध्यमातून आळंदी ते बोपखेल पर्यंतच्या दोन्ही पालखी मार्गावर व्यापक साफ-सफाई, स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि राजपिता रमित जी यांच्या प्रेरणेने आणि स्वच्छता ही सेवा या मानवकल्याणाच्या संदेशाला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात मिशनचे शेकडो सेवादल , स्वयंसेवक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले.

पालखी मार्गावरील रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, बसथांबे तसेच परिसरातील कचरा संकलित करून स्वच्छता करण्यात आली. भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरण उपलब्ध व्हावे, तसेच पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या स्वयंसेवकांनी निःस्वार्थ भावनेने केलेल्या सेवाकार्याचे कौतुक केले. आध्यात्मिकतेसोबत सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून अशा उपक्रमांमुळे समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संत निरंकारी मिशन-पुणे झोनचे झोनल इंचार्ज श्री अशोक अहुजा यांनी सांगितले की, सेवा, प्रेम, सहअस्तित्व आणि मानवतेचा संदेश कृतीतून समाजापर्यंत पोहोचविणे हे मिशनचे ध्येय असून, रक्तदान, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन आणि स्वच्छता अभियान यांसारखे विविध समाजोपयोगी उपक्रम देशभर सातत्याने राबविले जात आहेत.

या स्वच्छता अभियानाद्वारे संत निरंकारी मिशनने पुन्हा एकदा अध्यात्मासोबत सामाजिक बांधिलकी जपत सेवा हीच खरी उपासना हा संदेश कृतीतून अधोरेखित केला.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात वारकरी भाविकांसाठी शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्टतर्फे महाप्रसाद सेवा!

ठाणे (समर्थ गांवकरी)




संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२६ निमित्त शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे यांच्या वतीने वारकरी भाविकांसाठी भव्य महाप्रसाद सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक उपक्रम गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता सातारा जिल्ह्यातील लोणंद (ता. खंडाळा) येथे पार पडणार आहे.

यावेळी लाखो वारकरी भाविकांना बुंदी, पुलाव तसेच 'गीतासार' पुस्तिकेचे विनामूल्य वाटप करण्यात येणार असून, पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी ही सेवा भक्तिभावाने राबविण्यात येणार आहे.


या प्रसंगी आदरणीय शेठ श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), डॉ. बाळासाहेब गोविंदराव खरात, डॉ. विश्वासराव आरोटे, मा. नगरसेवक श्री मनोहर दिवाणे, श्री नाना महाराज देशमुख, श्री राजेंद्र पांडे, श्री राजेंद्र पुराणी, श्री कृष्ण बिरादार, श्री कांतीभाई बोऱ्हाडे (राजगुरूनगर) आणि विठ्ठलराव वरुडे पाटील यांच्या शुभहस्ते प्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.

या महाप्रसाद उपक्रमाचा विस्तार महाराष्ट्रासह इतर राज्यांपर्यंत करण्यात आला असून पुणे, मंचर, खेड, वाशी, मुलुंड, अकोला, राजगुरूनगर, जव्हार, मोखाडा, लोणावळा, सरळगाव, मुरबाड, भांडुप, नाशिक, लोणाड, आळंदी तसेच कच्छ (गुजरात), अंजार आणि कर्नाटक आदी ठिकाणीही बुंदी प्रसाद संबंधित संस्थांच्या माध्यमातून भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

वारकरी परंपरेतील सेवा, समर्पण आणि भक्तीचा संदेश जपणाऱ्या या उपक्रमामुळे संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्याचे आध्यात्मिक वातावरण अधिक समृद्ध होणार असून, सर्व वारकरी भाविकांनी या पवित्र महाप्रसाद सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# अकोले पोलिसांकडून बेवारस मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन!

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले शहरातील बस स्थानक परिसरात काल

अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एक ५५ ते ६० वर्षे वयोगटातील अनोळखी पुरुष मृत अवस्थेत मिळून आला आहे. या मृत इसमाची अद्याप ओळख पटलेली नसून, पोलिसांनी नागरिकांना ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे. याप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात अ.मु.रजि.नं. ६४/२०२६ बी.एन.एस.एस कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

मयत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:

वय: अंदाजे ५५ ते ६० वर्षे.

अंगावरील कपडे: पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा (फ्लोरल) शर्ट, निळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट आणि गळ्यात भगव्या रंगाचा पंचा.

शारीरिक ठेवण: दाढी-मिशा वाढलेल्या असून केस पांढरे व वाढलेले आहेत.

सध्याची स्थिती: मृतदेहाचे शवविच्छेदन (Post Mortem) करण्यात आले असून, ओळख पटवण्यासाठी सदर मृतदेह ग्रामीण रुग्णालय, कोतुळ येथील शवगृहात ठेवण्यात आला आहे.

या वर्णनाचा किंवा फोटोंमधील व्यक्तीबाबत काहीही माहिती मिळाल्यास अथवा नातेवाईकांचा शोध लागल्यास खालील क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा:

१) मा. पोलीस निरीक्षक संदीप कोळी - ८१०८०८११४४

२) पो.हवा. / ३५४ एस.जी. पवार - ९८२२७८२४५९

३) पो.हवा. / १३३३ हुसेन शेख - ७३६९६२२८१४

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

मुंबई (समर्थ गांवकरी)




माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'प्रीमियर शो ' झाला.

या ' प्रीमियर शो'साठी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले,उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते. हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

**थोडक्यात माहितीपट**

'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.

# सारडा महाविद्यालयात 'पिलई-इस्रो आऊटरीच प्रोग्राम' अंतर्गत 'सॅटेलाईट बनवा' कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विज्ञान आणि तंत्रज्ञान हे देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ -मधुसूदन सारडा



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय आणि मुंबई येथील पिलई एच.ओ.सी. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'पिलई-इस्रो आऊटरीच प्रोग्राम' अंतर्गत सॅटेलाईट बनवा या अभिनव व विज्ञाननिष्ठ कार्यशाळेचे आयोजन सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात नुकतेच संपन्न झाले.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनाविषयी आवड निर्माण करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन मधुसूदन सारडा हे होते.प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित,उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे तसेच पर्यवेक्षक डॉ. सुजित कुमावत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समन्वयक प्रा.अविनाश झरेकर यांनी प्रास्ताविकातून पिलई-इस्रो आऊटरीच प्रोग्राम ची उद्दिष्टे,विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाची गोडी निर्माण करण्याची आवश्यकता तसेच सॅटेलाईट बनवा या कार्यशाळेचे महत्त्व विशद केले.त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमधून संशोधनाची वृत्ती, नवोपक्रमशील विचार आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याचे आवाहन केले.अशा प्रकारे कार्यशाळेच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक स्वप्ने प्रज्वलित होण्यास मदत होते. तसेच हीच स्वप्ने त्यांना भविष्यात नवनिर्मिती आणि उत्कृष्टतेकडे घेऊन जातील.

याप्रसंगी मुंबई येथून खास आलेले पिलई-इस्रो आऊटरीच प्रोग्रामचे प्रतिनिधी आफशान खान, प्रियंका साह,नवल म हाडिक,आयुष बाबरे,शादाब सय्यद यांनी विद्यार्थ्यांना उपग्रहाची संकल्पना, त्याची रचना, विविध प्रणाली, कार्यपद्धती तसेच अंतराळ संशोधनातील उपग्रहांचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लघु उपग्रहाचे मॉडेल तयार करत विज्ञानातील विविध संकल्पना अनुभवातून आत्मसात केल्या.कार्यशाळेतील कृतीप्रधान शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता,तांत्रिक कौशल्य आणि संघभावना विकसित होण्यास मोठी मदत झाली.

अध्यक्षीय मनोगतात मधुसूदन सारडा यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान हे देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी नवसंशोधनाची कास धरून भविष्यात देशाच्या वैज्ञानिक प्रगतीत योगदान द्यावे.असे आवाहन केले तसेच सारडा महाविद्यालयाच्या अकरावी शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ऑगस्ट महिन्यात इस्रो या संस्थेमध्ये सहल आयोजित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

ब्रिजलाल सारडा यांनी विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली.हिंद सेवा मंडळाला गौरवशाली परंपरा असून येथील दादा चौधरी विद्यालयातील विद्यार्थी सामान्य परिस्थितीत शिक्षण घेऊन त्याची इस्रो या संस्थेमध्ये निवड झाली आहे.विद्यार्थ्यांनी अध्यात्म आणि विज्ञान यांची योग्य सांगड घालून वाटचाल करावी.असे गौरवोद्गार काढले.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी विज्ञान विभागाने आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून विद्यार्थ्यांनी त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर वर्षभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा महाविद्यालयाचा मानस त्यांनी बोलून दाखवला.याप्रसंगी त्यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकरांचा उल्लेख करून मनोरंजनातून विज्ञान प्रसार साधण्याचा उपक्रम महाविद्यालयातील विज्ञान विषयाच्या प्राध्यापकांनी राबवावा. असे आवाहन केले.

सध्या युद्धाच्या काळामध्ये युक्रेन आणि रशिया या देशांनी सगळ्यात जास्त प्रमाणात ड्रोन आणि सॅटॅलाइट प्रणालीचा वापर केला असल्याचे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा.गिरीश पाखरे यांनी केले.कोणत्याही राष्ट्राच्या संरक्षण सुसज्यतेच्या अनुषंगाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे व त्याच्या अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील विविध संधी तसेच उपयुक्तता याचा विचार करून त्याप्रमाणे वाटचाल करावी.असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ विज्ञानाची आवड निर्माण करून त्यांना संशोधनाच्या दिशेने प्रेरित करणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, भविष्यात अशा उपक्रमांमधून अनेक युवा वैज्ञानिक घडतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

याप्रसंगी प्रा.जयश्री पवार, प्रा.अपर्णा शेपाळ,प्रा. राहुल गागरे, प्रा.अश्विनीकुमार बिडकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.मंदार वैद्य यांनी केले.

# अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीवर सौ. अनिताताई जगताप पाटील यांची नियुक्ती; शिर्डीत विविध संस्थांकडून भव्य सत्कार



**शिर्डी (समर्थ गांवकरी)**

शिर्डी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा तथा अहिल्यानगर शिवसेना महिला आघाडी सहसंपर्क प्रमुख सौ. अनिताताई विजयराव जगताप पाटील यांची अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीच्या नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. या नियुक्तीच्या निमित्ताने आज शिर्डी नगरपरिषदेतील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील सभागृहात नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत शिर्डी नगरपरिषदेच्या वतीने सौ. अनिताताई जगताप पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी १२ नंबर चारी कृती समितीच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सेवाभावी संस्थेच्या वतीने मुस्लिम बांधवांनीही सौ. अनिताताई जगताप पाटील यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन प्रतापराव जगताप, नगरपरिषदेच्या गटनेत्या सौ. प्रतिक्षाताई कोते, बांधकाम सभापती अरविंद आप्पा कोते, महिला व बालकल्याण सभापती सौ. सुनीताताई गोंदकर, नगरसेविका छायाताई पोपट शिंदे, सौ. अलकाताई गोतीस तसेच नगरसेवक निलेश कोते, अमित शेळके, बापू ठाकरे, नितीन कोते, किरण कोते, सोमनाथ कोते यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अगस्ती ऋषी दिंडीच्या भक्तीरसात न्हाऊन निघाले अभिनवचे बाल वारकरी

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले ते पंढरपूर प्रस्थान करणाऱ्या अगस्ती ऋषी दिंडीच्या पवित्र सोहळ्यात अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडेमी व मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकरी परंपरेचे मनोहारी दर्शन घडविले. रिंगण, लेझीम, टाळ, पावली, अभंगगायन आणि आकर्षक नृत्याविष्कारातून विद्यार्थ्यांनी भक्तिमय वातावरण निर्माण केले. विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल... या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसाने दुमदुमून गेला.

वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेची पालखी खांद्यावर घेत मिरवणूक काढली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत नामदेव यांच्या विचारांचा संदेश देणारे फलक हातात घेऊन त्यांनी भक्ती, समता आणि बंधुभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

या सोहळ्यात संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा डी., उपप्राचार्या राधिका नवले, संचालक मंडळ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाचे संस्कार, भारतीय संस्कृतीची ओळख आणि सामाजिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या शेवटी प्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांनी केले. संगीत शिक्षक राम आहेर, नृत्य शिक्षक प्रशांत दिवेकर, काव्या कदम, कला शिक्षिका संतोष घोडेकर, सुमन धिंदळे, काजल डावखर तसेच क्रीडा शिक्षक आदिनाथ आभाळे, सागर साळुंके,अश्विनी काळे, पंकज धुमाळ, दिव्या खताळ, आणि अश्विनी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी सोहळा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत मंडलिक यांनी केले.

# डोंगरगाव येथील हनुमान भजनी मंडळाला एन.के. टी. ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सतरंजी व घड्याळाची भेट!

**अकोले (समर्थ गांवकरी)**





अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील हनुमान भजनी मंडळासाठी शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे आणि दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने सतरंजी व भिंतीवरील घड्याळ भेट देण्यात आले.

या उपक्रमासाठीचे साहित्य महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित होते.


ग्रामीण भागातील धार्मिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे तसेच भजनी मंडळाच्या नियमित भजन, कीर्तन व आध्यात्मिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक संस्थांना सहकार्य करण्याचा प्रयत्न शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सातत्याने केला जात असून, भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांना सहकार्य सुरू राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# राजूर ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार; कचरा व्यवस्थापनाच्या हलगर्जीमुळे प्रवरा नदी प्रदूषित, नागरिकांच्या आरोग्याला धोका! गटविकास अधिकारी अमर माने शांत का?

**राजूर (समर्थ गांवकरी)**







अकोले तालुक्यातील राजूर ग्रामपंचायतीच्या कथित अनागोंदी कारभारामुळे परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. निकृष्ट दर्जाची कचरा कुंडी, ओला व सुका कचरा विलगीकरणाची कोणतीही व्यवस्था नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

याशिवाय, प्लास्टिक व कचऱ्याने दूषित झालेले सांडपाणी चितळवेढे येथील शेतजमिनीत सोडण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हेच दूषित पाणी पुढे थेट प्रवरा नदीपात्रात मिसळत असल्याने नदीचे प्रदूषण वाढत असून पर्यावरणावरही विपरीत परिणाम होत आहे.

दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे चितळवेढे गावातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राजूर महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज या परिसरालगत असल्याने येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कचरा व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करावी, दूषित पाण्याचा प्रवाह त्वरित बंद करावा आणि जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. विशेष म्हणजे राजुर ग्राम पंचायतीने जो कचरा चितळवेढा हद्दीवर टाकण्यात आला तो अनाधिकृतपणे आहे खाजगी जागेवर हा कचरा टाकण्यात आला असून या कचऱ्याची दुर्गंधी चितळे निळवंडे विटे या परिसरासह मोठ्या प्रमाणात आजार फैलावले आहे. राजुर ग्रामपंचायतीने कचरा टाकत असताना हा कचरा पंचक्रोशीतील नागरिक व ग्राम पंचायतींचे परवानगी घेतली नाही या कचऱ्यामुळे या परिसरातील आजाराला मोठे निमंत्रण प्राप्त झाले आहे हा कचरा जेव्हा जळतात तेव्हा त्याची दुर्गंधी संपूर्ण भागात पसरत असते किती जणांचा बळी गेल्यानंतर या प्रशासनाला जाग येणार राजुर ग्रामपंचायत पहिल्यापासूनच चुकीच्या कामांना प्राधान्य देत आहे आता तरी याकडे प्रशासन लक्ष देणार आहेत की नाही अकोल्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी अमर माने यांच्याकडे या प्रकरणाची माहिती देण्यात आली असून तातडीने संबंधित ग्रामपंचायतीला याबाबत विचारणा करण्यात येईल असे उत्तर दिले मात्र या उत्तराने परिसरातील नागरिकांचे समाधान होईल का या भागात मागील पावसामध्ये संपूर्ण कचरा हा या भागातील प्रवरा नदी पात्रालगत जाऊन मोठ्या प्रमाणात आजार फैलवण्याची शक्यता असून आता तरी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे राजुर ग्रामपंचायतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वेगळ्या ठिकाणी वेगळा डेपो तयार करणे ही काळाची गरज आहे दिवसेंदिवस या ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्र कमी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे या ठिकाणी सुविधा देण्यासाठी ग्रामपंचायत असा संवाद देखील व्यक्त होऊ लागला आहे बेगम के शादी मे अब्दुल्ला दिवाना याप्रमाणे या ग्रामपंचायतीची परिस्थिती निर्माण झाली आहे कचरा राजूरकरांचा त्रास मात्र चितळवेढेकराना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३५/२०२६ अकोले दि. १०/०७/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. महादू बहिरू कवटे, रा. मवेशी,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आजी कै. गंगुबाई बारकु लाडके यांचा मृत्यू दि. २८/०८/२०२१** रोजी **मौजे वागदरी** येथे झाला असुन त्यांच्या **आजीच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय वागदरी,** ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. महादू बहिरू कवटे, रा. मवेशी** ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची आजी कै. गंगुबाई बारकु लाडके यांचा मृत्यू दि. २८/०८/२०२१** रोजी **मौजे वागदरी** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय वागदरी,** ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १०/०७/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यु/एसआर १८३/२५ दिनांक : ११/५/२०२६

नोटीस

**विकास बाबुराव हांडे, रा.धोलवड, ता. जुन्नर जि. पुणे - अपिलार्थी**
**विरुद्ध...... निबंधक , जन्म -मृत्यू नोंदणी अधिकारी - प्रतिवादी**
**ग्राम अधिकारी / मुख्याधिकारी, ग्रामपंचायत धोलवड**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **श्री विकास बाबुराव हांडे, रा. धोलवड,** ता जुन्नर जि पुणे यांनी वडील नामे **कै बाबुराव तुकाराम हांडे** यांचा **मृत्यू** दिनांक **१६/०४/१९६९** रोजी **मौजे धोलवड,** ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा मृत्यू नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ १८३/२५ दिनांक १७.१०.२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.११/५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**अर्चना तांबे**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३३/२०२६ अकोले दि. २४/०६/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. बबुबाई बाळू आढाव, रा. लहित बु.,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे पती कै. बाळू केशव आढाव यांचा मृत्यू दि. २७/१०/२०१०** रोजी **मौज लहित बु.** येथे झाला असुन त्यांच्या **पतीच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय लहित बु.,** ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. बबुबाई बाळू आढाव, रा. लहित बु.** ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांचे पती कै. बाळू केशव आढाव यांचा मृत्यू दि. २७/१०/२०१०** रोजी **मौज लहित बु.** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय लहित बु.,** ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २४/०६/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# प्रति आवर्तन २४ हेक्टरला मिळणार एक कोटी लिटर पाणी : डॉ. सुजय विखे पाटील

आश्वी (समर्थ गांवकरी)

**निळवंडे लाभक्षेत्रातील अनेक भागाला अद्याप पाण्याचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे पाणी वाटपासाठी लवकरच स्वतंत्र 'पाणी वाटप संस्था' स्थापन केली जाणार आहे. या संस्थेच्या चेअरमनपदी त्या क्षेत्रातील सर्वात मोठे क्षेत्र असणारा शेतकरी असेल. तसेच आठ-आठ हेक्टरचे तीन गट करून एका आवर्तनात प्रत्येक गटाला ३० लाख लिटर पाणी दिले जाईल. अशा प्रकारे २४ हेक्टरला एका आवर्तनात पाईपद्वारे तब्बल एक कोटी लिटर पाणी पुरवण्यात येईल. असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.**






संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे शुक्रवारी (दि. १०) शिर्डी विधानसभा मतदारसंघ स्तरीय आढावा व समन्वय बैठक तसेच मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) बैठक पार पडली. यामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. विखे पाटील बोलत होते. ज्येष्ठ नेते शाळीग्राम होडगर, कैलास तांबे, मच्छिंद्र थेटे, आर. डी. कदम, विजय म्हसे, भगवान इलग, कांचनताई मंढरे, रोहिनीताई निघुते, तबाजी मुन्तोडे, अजय ब्राम्हणे, गोकुळ दिघे, दिलिप मुन्तोडे, सतिश जोशी, शिवाजी इलग, भारत गिते, अशोक जऱ्हाड यांच्यासह २८ गावातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी, बीएलओ आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले की, निळवंडे धरणाचे पाणी प्रत्येक शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी पाईपलाईनचे जाळे विणावे लागेल. ऑटोमेशनची योजना रद्द करून त्यातून वाचणारे ६० कोटी रुपये आता शेतकऱ्यांच्या थेट उपयोगासाठी वळवले असून यातून शेततळ्यांचे आच्छादनासाठी लागणाऱ्या प्लास्टिक कागदासाठी शेतकऱ्यांना ६० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. यामुळे आवर्तन संपल्यानंतरही शेततळ्याच्या माध्यमातून दोन महिने शेतीला पाणी देणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. तसेच, मॅन्युअल व्हॉल्व्हच्या तीन पाईपामध्ये आणखीन एक पाईप जोडून ओव्हरफ्लोचे पाणी प्रत्येक गावातील शेततळ्यात सोडण्याचे नियोजन मंत्री विखे पाटील यांच्या संकल्पनेतून करण्यात आल्याचे देखील त्यांनी आवर्जून सांगितले. निमगावजाळी येथे उभारण्यात येणाऱ्या 'बिबट सफारी' प्रकल्पासाठी सुरवातीला १५ कोटी मंजूर झाले आहेत. केंद्र सरकारच्या परवानगीनंतर त्याचे काम लवकरच सुरू होईल. तसेच, निझर्णेश्वर मंदिर परिसरात प्राणी संग्रहालय उभारण्याचा प्रस्तावही सरकारला पाठवण्यात येणार असल्याचे डॉ. विखे यांनी सांगितले. यामुळे स्थानिक तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि यातून अर्थकारणाला मोठी चालणा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी

प्रवरा डाव्या आणि उजव्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी दीडशे कोटी रुपये मंजूर केले असून लवकरच कालवा आणि पोटचाऱ्याच्या कामांना गती मिळणार असल्याचे देखील सांगितले. भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधताना डॉ. विखे पाटील म्हणाले, विखे पाटील परिवाराचे अस्तित्व भाजपमुळे आहे. त्यामुळे पक्षाचे सर्व कार्यक्रम पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी नियमितपणे पार पाडावेत अशा सूचना दिल्या. तसेच भाजप सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासकामांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा. असे आवाहन केले.

दरम्यान, डॉ. विखे पाटील यांनी

यावेळी मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षणाबाबतही मार्गदर्शन केले. ते म्हणाले २००२ आणि २०२४ च्या यादीतील नावे आणि मतदारांची समांतर पडताळणी पूर्ण झाली असून, सध्या सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मध्ये सर्वांनी नोंदणी करावी. यामधून कोणीताही पात्र व्यक्ती सुटणार नाही अपात्र व्यक्ती फॉर्म भरणार नाही. याची खबरदारी बीएलओ आणि कार्यकर्त्यानी अचूक पार पडावी, यासाठी योग्य त्या सूचना त्यांनी दिल्या.

## मतदार यादी सर्वेक्षणात कसूर करणाऱ्या BLO वर कारवाई करा; मनविसेचे शिर्डी प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन

शिर्डी (समर्थ गांवकरी)

मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत बीएलओंनी घरोघरी जाऊन अचूक सर्वेक्षण करावे. या कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे (मनविसे) शिर्डी शहराध्यक्ष प्रशांत वाघचौरे यांच्या वतीने प्रांत अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

प्रशासनाने या मागणीवर तातडीने कार्यवाही न केल्यास मनसे जिल्हाध्यक्ष राजेश लुटे व मनसे तालुकाध्यक्ष गणेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

सध्या मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षणाचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत बीएलओंनी प्रत्येक घरात जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे नियमानुसार बंधनकारक आहे. मात्र, अनेक ठिकाणी या कामात दिरंगाई होत असून काही कर्मचारी कर्तव्यात कसूर करीत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे अनेक पात्र नागरिक मतदार यादीतून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मनविसेने संबंधित निष्काळजी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मतदार यादीचे काम पारदर्शक, अचूक आणि वेळेत पूर्ण



व्हावे, यासाठी प्रशासनाने लक्ष घालावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देताना मनविसेचे शिर्डी शहराध्यक्ष प्रशांत वाघचौरे यांच्यासह मनसे शिर्डी शहराध्यक्ष लक्ष्मण कोतकर, चेतन झिंजाड, अभिषेक पोपळघट, साई कुमावत, गौरव भालेराव, ऋषी धिवर, प्रवीण आसने, रवी कुसळकर व किरण पगारे आदी पदाधिकारी आणि मनसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महालक्ष्मी विद्यालयातील विद्यार्थ्यांना एन.के.टी. ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सतरंजी व घड्याळाची भेट!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथील महालक्ष्मी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे आणि दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने सतरंजी व भिंतीवरील घड्याळ भेट देण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी आवश्यक साहित्य महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका सहसचिव सचिन लगड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.




यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक चांगले व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शैक्षणिक संस्थांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सातत्याने केला जात आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शाळेतील दैनंदिन शैक्षणिक उपक्रम अधिक सुलभपणे पार पाडण्यास मदत होणार असून, भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांद्वारे शिक्षण क्षेत्राला भरीव योगदान देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# लडाख मध्ये बौद्ध विश्वविद्यापीठ स्थापन करणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले









लेह (समर्थ गांवकरी)

लडाख च्या तीन लाख लोकसंख्येपैकी दोन लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या बौद्धांची आहे. लडाख च्या घराघरात बौद्ध धम्म आणि बौद्ध तत्वज्ञान आहे.शेकडो वर्षांपासून येथील बौद्ध कुटुंबातील प्रत्येक जण तिबेट मधील बौद्ध मठांमधून बौद्ध धम्माचे बौद्ध तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेऊन पुन्हा लडाख मध्ये येत असत. लडाख मध्ये अनेक बुद्धविहारे आणि बौद्ध भिक्खू निवास बौद्ध मठ आहेत.त्यातून बौद्ध तत्वज्ञान जपले गेले आहे. त्या सर्व बौद्ध धम्माच्या तत्वज्ञानाचे विचारांचे. संचित एकत्र जगाला उपलब्ध करून देण्यासाठी तक्षशिला ; नालंदा या बौद्ध विश्वविद्यापीठाच्या धर्तीवर लडाख मध्ये बौद्ध विश्वविद्यापीठ स्थापन करण्याची येथील जनतेची मागणी योग्य असून त्यासाठी आवश्यक असणारी जमीन मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिले.

लडाख मधील लेह येथील कम्युनिटी हॉल मध्ये बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया लडाख च्या वतीने आयोजित सभेत प्रमुख अतिथी म्हणून ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी पूज्य भंते संघसेना; अध्यक्षस्थानी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे ट्रस्टी आणि चेअरमन चंद्रबोधी पाटील तसेच लडाख बुद्धिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष छेरिंग दोरजे; बुद्धिस्ट सोसायटी चे सँपले त्सेरिंग ; लामा सोनम सोस्पेल; ताशी नामग्याल; नवांग शेरिंग; रिक्जीन स्पलबर; ताशी अँग्मो; रतन सोमकुनवर; अशोककुमार असाया आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

लडाख मध्ये पाणी नाही ; शेती नाही ऑक्सिजन सुद्धा नाही.परंतु बौद्ध धम्म विचाराने येथील जनता मजबुतीने जीवन जगत आहे.त्याच मजबुतीने येथील जनतेने बौद्ध धम्म प्रबळ केला आहे.या भागात शेती आणि उद्योग वाढविण्यासाठी पाणी आणावे लागेल. पवनचक्की; सोलर ऊर्जा चे प्रकल्प उभे करावे लागतील. येथील परंपरागत पश्मीना आणि सीबक्थोम चे लघु उद्योग ला प्रोत्साहन देऊन ते वाढवावे लागतील त्यासाठी आपण केंद्र सरकार तर्फे प्रयत्न करू असे ना. रामदास आठवले म्हणाले.

लडाख मध्ये बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे कामकाज चांगले आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चा लडाख ; हिमाचल प्रदेश त्रिपुरा पर्यंत च्या सर्व हिमालयीन बेल्ट मध्ये बौद्ध धम्म प्रसाराचे काम सुरू आहे. बौद्ध धम्म चळवळीला देशभर मजबूत साथ बळ देण्याचे काम आमचे मार्गदर्शक आणि देशातील लोकप्रिय बौद्धनेते रामदास आठवले करीत आहेत. त्यांचे कोल्हापूर ते मुंबई चे रात्रीचे विमान रद्द झाले तरीही ते थांबले नाहीत ते कोल्हापूर हून बाय रोड मुंबई ला सकाळी ६ वाजता पोहोचले आणि तिथून ७वाजता विमानाने लेह लडाख ला आपल्या कार्यक्रमात पोहोचले आहे. धम्मकार्यासाठी रामदास आठवले सतत अग्रेसर राहतात त्यामुळे त्यांना धम्मबळ लाभत आहे असे सांगत बुद्धिस्ट सोसायटी ऑफ

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### लिंगेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना एन.के.टी ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सतरंजी व घड्याळाची भेट!



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील लिंगेश्वर माध्यमिक विद्यालय व लिंगेश्वर वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे आणि दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने सतरंजी व भिंतीवरील घड्याळ भेट देण्यात आले.

या उपक्रमासाठी आवश्यक साहित्य लिंगेश्वर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक राधाकिसन लांडगे व सेवानिवृत्त कर्मचारी चंद्रभान जोर्वेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, कार्यालय व्यवस्थापक अमोल पुंडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण अधिक सुसज्ज व सुविधायुक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असून, सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्राला हातभार लावण्याचा हा प्रयत्न असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत राष्ट्रीय क्युपंक्चर परिषद; उपस्थितीचे प्रबंधक नारायण नवले यांचे आवाहन !

देशभरातील क्युपंक्चर तज्ज्ञ, व्यावसायिक आणि विद्यार्थी एकत्र येणार




अकोले (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र अक्युपंक्चर परिषद, मुंबई व आयुष्मान अक्युपंक्चर कॉलेज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आयोजित भव्य राष्ट्रीय क्युपंक्चर परिषदेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यासह देशभरातील क्युपंक्चर व्यावसायिक, तज्ज्ञ, संशोधक उपस्थित राहणार असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र क्युपंक्चर परिषदेचे प्रबंधक नारायण नवले यांनी केले आहे.

नवले यांनी सांगितले की, २०१५ मध्ये महाराष्ट्रात क्युपंक्चरविषयक कायदा अस्तित्वात आल्यानंतर परिषदेचे कामकाज अत्यंत पारदर्शकपणे सुरू असून सुमारे साडेसहा हजार नोंदणीकृत व्यावसायिक आज आपला व्यवसाय नियमबद्ध व यशस्वीपणे करीत आहेत. क्युपंक्चर क्षेत्राचा विकास, व्यावसायिकांचे प्रश्न, नवीन संशोधन आणि भविष्यातील संधी यांवर या राष्ट्रीय परिषदेत सविस्तर चर्चा होणार आहे.

या परिषदेस महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे माजी संचालक डॉ प्रवीण शिंगारे,परिषदेचे प्रशासक डॉ. रुमी बेरामजी तसेच देशभरातील नामवंत क्युपंक्चर तज्ज्ञ आणि व्यावसायिक उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेमध्ये क्युपंक्चर क्षेत्रातील संशोधन, प्रशिक्षण, नोंदणी, कायदेशीर बाबी आणि व्यवसाय विकास या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त अक्युपंक्चर तज्ञ, व्यावसायिक, विद्यार्थी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आवाहन मातोश्री गंगूबाई शिंदे अक्युपंक्चर कॉलेज चे सचिव डॉ अनिल रहाणे व प्राचार्य डॉ राज तासकर यांनी केले आहे.

### नगर महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यपदी निवडीबद्दल डॉ.अभिजित कुलकर्णी यांचा सत्कार




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहमदनगर हाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल डॉ.अभिजित कुलकर्णी यांची आज सामाजिक कार्यकर्ते व जिल्हा पत्रकार संघाचे सदस्य शकील जहागीरदार यांनी सदिच्छा भेट घेतली.व त्यांचा निवडीबद्दल सत्कार करून पुढील वाटचालीस व शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या भेटीदरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध घडामोडींवर आणि महाविद्यालयाच्या आगामी उपक्रमांवर चर्चा झाली. महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन या वेळी प्रभारी प्राचार्य डॉ.अभिजित कुलकर्णी यांनी केले.या सदिच्छा भेटीबद्दल त्यांनी शकील जहागीरदार यांचे आभार मानले.

# नाशिक - पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी ९ ऑगस्ट ला मोठे जनआंदोलन : आ. सत्यजित तांबे

## लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत समृद्धी व नाशिक पुणे हायवे रास्ता रोको

संगमनेर (समर्थ गांवकरी)

**मुंबई नाशिक पुणे गोल्डन ट्रँगल वरील अत्यंत महत्त्वाचा असलेल्या आणि उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा नाशिक - पुणे रेल्वे मार्ग हा संगमनेर या सरळ मार्गेच व्हावा या आग्रही मागणीसाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये ९ ऑगस्ट २६ रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली असून या जनआंदोलनात सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या एकजुटीने आवाज उठवावा असे आवाहन त्यांनी केले आहे.**

नाशिक - पुणे सरळ रेल्वे महामार्गाबाबत महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याकरता सर्वप्रथम मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी २००० मध्ये तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांना पत्र दिले होते. यानंतर या रेल्वेमार्गासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.यानुसार कार्यवाही सुरू झाली.महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये या कामाला अत्यंत वेग आला. नाशिक, सिन्नर ,संगमनेर, जुन्नर ,नारायणगाव, मंचर, खेड ,चाकण, पुणे असा हा सरळ आणि नैसर्गिक रेल्वे मार्ग आहे. याकरता भूसंपादन होऊन सुमारे ६५० कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात करण्यात आले .त्यावेळेस एमएम आरडीचे कोणतेही कारण सरकारने दिले नव्हते.

मात्र महाविकास आघाडी सरकार बदलले आणि महायुतीचे सरकार आले आणि या सरळ मार्गांमध्ये राजकारण सुरू झाले. हा मार्ग ग्रामीण भाषेतील पुण्यावरून पुणतांबा करताना नाशिक सिन्नर शिर्डी अहिल्यानगर पुणे असा प्रास्तावित केला आहे. ही बातमी कळताच संपूर्ण तालुक्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. कारण हा सरळ रेल्वे मार्ग पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्र यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

या रेल्वे मार्गामुळे तरुणांना नोकरीसाठी पुणे नाशिक याकरता जाता येणार आहे. तर या मार्गावरील शेतकऱ्यांना आपला शेतमाल सहजरीत्या बाहेर पाठवता येणार आहे .याचबरोबर मुंबई पुणे नाशिक या गोल्डन ट्रँगल वरील औद्योगीकरणाच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा हा रेल्वे मार्ग आहे. या विभागाच्या विकासासाठी हा मार्ग महत्त्वाचा असताना बदलावला गेल्या कसा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

यानंतर लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन हा मार्ग सरळ मार्गे झालाच पाहिजे हा आग्रह केला.





तर आमदार सत्यजित तांबे यांनी या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र करून बैठक घेतली याचबरोबर विधान परिषदेमध्ये सातत्याने आवाज उठवला. जनतेमध्ये जनजागृती करून मोठे आंदोलन उभे करण्यासाठी व्यासपीठ निर्माण केले. मुख्यमंत्री, विविध मंत्री यांच्याबरोबर चर्चा केली. भविष्यातील पिढ्यांच्या समृद्धीसाठी मार्ग असून याकरता एकत्रित लढावा लागणार आहे.

मात्र राजकीय हेतू ठेवून संगमनेर चे नवीन लोकप्रतिनिधी सुरुवातीला रेल्वे पळवण्याची टिंगल करत होते .मात्र खरोखर रेल्वे पळवल्याने आता ते सोयीस्कर रित्या गप्प बसून आहेत. यावर संगमनेर तालुक्यात मोठी नाराजी निर्माण झाली. तर सोशल माध्यमांमधून त्यांच्यावर प्रचंड टीका झाली आहे. तर काहींनी अकोले व संगमनेर तालुक्यामध्ये वाद लावण्याचा प्रयत्न करून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न केला.

मात्र संगमनेर व अकोले तालुका हे भाऊ भाऊ असून यामध्ये कायम एकजूट आहे. दोन्ही तालुके विकासाकरता एकमेकांना सहाय्य करत असून अकोले व संगमनेर एकच असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

रेल्वे करता महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, लोकसभेतील खासदार डॉ.अमोल कोल्हे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सत्यजित तांबे,मा.आ.डॉ.सुधीर तांबे, यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये ९ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने समृद्धी महामार्ग व नाशिक पुणे महामार्गावर भव्य रास्ता रोको करण्यात येणार आहे.

त्यामुळे या जनआंदोलनामध्ये सर्व विद्यार्थी युवक नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व आपला एकत्रीत आवाज केंद्रीय मंत्रिमंडळापर्यंत पोहोचून ही रेल्वे स्थळ मार्गीच व्हावी याकरता आपल्या सर्वांना लढावे लागणार आहे त्यामुळे सर्वांनी या मोठ्या जन आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे आग्रही आवाहन नाशिक पुणे रेल्वे कृती समिती, नाशिक जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा व पुणे जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वामी समर्थ केंद्र, गणोरे येथे एन.के.टी. ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून सतरंजी, घड्याळ व हरिपाठ भेट!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील गणोरे येथील स्वामी समर्थ केंद्रासाठी शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे आणि दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने सतरंजी, भिंतीवरील घड्याळ व हरिपाठ ग्रंथ भेट देण्यात आले.

या उपक्रमासाठीचे साहित्य महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका उपाध्यक्ष जगन्नाथ आहेर व रमेश आंबरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित होते.

धार्मिक व सामाजिक कार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. स्वामी समर्थ केंद्रातील भक्तांना हरिपाठ व अन्य धार्मिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, तसेच सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक संस्थांना सहकार्य करण्याच्या हेतूने शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून ही भेट देण्यात आली. भविष्यातही समाजोपयोगी, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अशा उपक्रमांना सातत्याने सहकार्य करण्यात येणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# नगर शहरात भेसळीचे दूध पॅकेट नष्ट ; उत्पादन केंद्र परवान्याअभावी बंद

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणी मोहिमेअंतर्गत केडगाव परिसरातील शितल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्स आणि झकास वडापाव सेंटरवर कारवाई करण्यात आली. शितल मिल्कमधील भेसळीचा संशय असलेले ५५६ दूध पॅकेट जप्त करून नष्ट करण्यात आले, तर आवश्यक परवाना नसल्याने झकास वडापाव सेंटरचे उत्पादन केंद्र बंद करण्याचे आदेश देण्यात आले.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार राज्यभर अन्नपदार्थांची तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार बुधवारी (८ जुलै) सहायक आयुक्त गौरव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी किरण जगदाळे आणि साजिदा मुल्ला यांनी केडगाव येथील शितल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्स येथे तपासणी केली. या ठिकाणी दूध संकलन करून त्याचे पिशव्यांमध्ये पॅकिंग करून विक्री केली जात असल्याचे आढळून आले.

तपासणीदरम्यान अधिकार्यांना दूधाच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने १५ हजार ५६८ रूपये किमतीच्या ५५६ दूधाच्या बॅग जप्त करण्यात आल्या. संबंधित दूधाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून जप्त केलेला साठा जागेवरच नष्ट करण्यात आला, अशी माहिती सहायक आयुक्त गौरव जगताप यांनी दिली.

दरम्यान, गुरूवारी केडगाव येथील झकास वडापाव सेंटरच्या उत्पादन केंद्राचीही तपासणी करण्यात आली.

# विधानसभेत अकोलेच्या प्रश्नांवर आमदारांचा आवाज; शेतकरी, आदिवासी, पाणी व विकासकामांसह विविध मागण्या!




मुंबई (समर्थ गांवकरी)

विधानसभेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत रात्री १.४५ वाजता अकोले विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न सभागृहात मांडण्यात आले. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत, जलजीवन मिशनची कामे पूर्ण करणे, आदिवासी भागासाठी नवीन धरणे, चास-पिंपळदरी व शिसवद पुलांची उभारणी, बारी-संगमनेर (कोल्हार-घोटी) रस्त्याच्या ठेकेदारावर कारवाई, भंडारदरा रिंग रोड, मंजूर एम आयडीसीत उद्योग सुरू करणे, तोलार खिंड बोगदा, आदिवासी भागातील रस्ते व आरोग्य सुविधा, तसेच आदिवासी हक्कांचे संरक्षण व पेसा भरती प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. यासह पिंपळगाव खांड धरणाला लोकनेते अजितदादा पवार जलाशय असे नाव देण्याची तसेच अजितदादा पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी करण्याची मागणीही सभागृहात करण्यात आली.

# महायुतीच्या एकजुटीवर पुन्हा शिक्कामोर्तब!

## वडगाव गुप्ता सोसायटीकडून भीमराव मारुती डोंगरे यांच्या नावाचा एकमुखी ठराव; माजी सरपंच तथा उपसरपंच विजयराव शेवाळे यांच्या निर्णयाला सर्वांचा ठाम पाठिंबा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

वडगाव गुप्ता विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची विशेष सभा उत्साही आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. आगामी जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित सभेत भीमराव मारुती डोंगरे यांच्या नावाचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावाचे सूचक प्रल्हाद डोंगरे तर अनुमोदक किसन शेवाळे होते. उपस्थित सर्व सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात ठरावास मंजुरी दिली.

चेअरमन बाबासाहेब डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला माजी प्राचार्य शिवाजी घाडगे, प्रल्हाद डोंगरे, भीमराज गव्हाणे, राजेंद्र शेवाळे, बापू डोंगरे, भिमराज डोंगरे, सुरेश डोंगरे, किसन शेवाळे, डॉ. बबनराव डोंगरे, नामदेव आंबेडकर, ताराबाई शेळके, सौ. पुष्पा पवार यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी सरपंच तथा उपसरपंच विजयराव शेवाळे म्हणाले, वडगाव गुप्ता विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीने यापूर्वीही माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या समर्थनार्थ ठराव मंजूर केले आहेत. त्याच भूमिकेवर आजही आम्ही ठाम असून सर्वांना एकत्र आणत भीमराव मारुती डोंगरे यांच्या नावाचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही आम्ही महायुतीसोबतच राहणार आहोत.

ते पुढे म्हणाले, जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेसाठी सोसायटीच्या प्रतिनिधीचा ठराव मंजूर करण्यासाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार अक्षय कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ. बबनराव डोंगरे, राजू शेवाळे, चेअरमन बाबासाहेब डोंगरे तसेच सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने भीमराव मारुती डोंगरे यांच्या नावाचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. निवडणुकी संदर्भातील सर्व आवश्यक कामकाज करण्याचे अधिकारही त्यांना देण्यात आले आहेत.

सभेतील विशेष बाब म्हणजे माजी सरपंच तथा उपसरपंच विजयराव शेवाळे यांनी मांडलेल्या निर्णयाला सर्व संचालक, पदाधिकारी आणि उपस्थित सदस्यांनी एकमुखी सहमती व ठाम पाठिंबा दर्शविला. त्यानंतर भीमराव मारुती डोंगरे यांच्या नावाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.



सभा अखेरपर्यंत अत्यंत सौहार्दपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. एकमताने झालेल्या या निर्णयामुळे सोसायटीतील एकजूट आणि सहकाराची परंपरा पुन्हा अधोरेखित झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# भेसळखोरांनो सावध! कळवणच्या जयपूरने दिला शुद्धतेचा दणका : गायकवाडांचे १००% ओरिजिनल दूध

- अभोना चौफुलीवर सकाळ-संध्याकाळ रांग : नाशिकपर्यंत पोहोचली जयपूरच्या दूधाची पत
- तुकाराम मुंढेंच्या धडक मोहिमेत उजळला कळवणचा चेहरा : गायकवाडांचे खात्रीचे दूध

कनाशी/अनिल पवार (समर्थ गांवकरी)


राज्यात सध्या दुधात पाणी, पावडर आणि रसायनांची भेसळ करून आरोग्याशी खेळणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. अशा काळात कळवण तालुक्यातील जयपूर गावाने मात्र संपूर्ण जिल्ह्यासमोर शुद्धतेचा आदर्श उभा केला आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळखोरांविरोधात कंबर कसली असताना, गायकवाड ब्रदर्स डेअरी फार्म ने गेल्या अनेक वर्षांपासून जपलेली १००% ओरिजिनल दुधाची पत अधिकच उजळली आहे.

प्रगतशील शेतकरी हिराजी उखाजी गायकवाड यांचे सुपुत्र मेघराज हिराजी गायकवाड आणि अनिल गायकवाड यांचा हा वडिलोपार्जित व्यवसाय आज केवळ व्यवसाय न राहता कळवणकरांच्या आरोग्याची हमी बनला आहे. त्यांच्याकडील जाफ्रा जातीच्या म्हशी रोज सकाळी आणि संध्याकाळी मिळून १०० लिटर पर्यंत दूध देतात. या दुधात कोणतीही भेसळ नाही, कोणतेही केमिकल नाही. आमचा शब्द म्हणजे शपथ अशी ग्वाही ते देतात.

सकाळी ७ वाजता आणि संध्याकाळी ६ वाजता अभोना चौफुली येथे त्यांच्या दुधाच्या गाडीसमोर ग्राहकांची तोबा गर्दी असते. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सगळे याच दूधासाठी आवर्जून येतात. विशेष बाब म्हणजे सकाळी ६ वाजताची नाशिकची पहिली बस पकडणारे बँक कर्मचारी, शिक्षक आणि नोकरदार वर्गही आपल्या कुटुंबासाठी २-२ लिटरचे कॅन घेऊन नाशिकला जातात. दुसरीकडचे दूध घेण्यापेक्षा सकाळी लवकर उठून गायकवाडांचे दूधच बरे अशी प्रतिक्रिया ग्राहक देतात.

राज्य सरकारने भेसळयुक्त दुधावर कारवाईचा बडगा उगारला आहे. या पार्श्वभूमीवर मेघराज आणि अनिल गायकवाडांसारखे प्रामाणिक उत्पादक चर्चेचा आणि कौतुकाचा विषय बनले आहेत. भेसळीमुळे लोकांचा विश्वास उडाला असताना, गायकवाड ब्रदर्सच्या दूधाला मागणीचा महापूर आला आहे. दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढत आहे.

शेतीला तोटा आणि स्थलांतराचा काळ असताना, गायकवाड बंधूंनी दूध व्यवसायातून स्वावलंबनाचा नवा मार्ग दाखवला आहे. त्यांच्या फार्मवर ४-५ स्थानिक तरुणांनाही रोजगार मिळाला आहे. भेसळीच्या या अंधारात गायकवाड ब्रदर्स, जयपूर हे नाव कळवणच्या मातीचा अभिमान आणि शुद्धतेचा नवा किरण बनले आहे.





पाणी मिसळायचं असतं तर आम्ही हा व्यवसायच केला नसता. आम्ही कष्टकरी शेतकरी आहोत. आमच्याकडे २० जाफ्रा म्हशी आहेत आणि त्या रोज सकाळ-संध्याकाळ मिळून १०० लिटर दूध देतात. हे दूध १००% शुद्ध आणि नैसर्गिक स्वरूपात थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणं हाच आमचा धर्म आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळून दोन पैसे जास्त कमवण्यापेक्षा, आम्ही प्रामाणिकपणे कष्ट करून १००० घरांचा विश्वास कमावला आहे. आमच्या तबेल्यातून निघणारं प्रत्येक थेंब शंभर टक्के ओरिजिनल आहे. यात पाण्याचा एकही थेंब नाही. एका आईला तिच्या मुलासाठी जे दूध लागतं, तेच दूध आम्ही तुम्हाला देतो. हा आमचा वादा आहे आणि तो आम्ही शेवटपर्यंत पाळणार.

**-अनिल गायकवाड, गायकवाड ब्रदर्स डेअरी फार्म, जयपूर**

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिष्यवृत्तीत चैतन्य विद्यालयाचे सुयश

ओतुर (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय,ओतूर येथील चार विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली. परीक्षेत उत्तम गुण मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल केल्याबद्दल या विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली. यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे स्वरा छगन पानसरे (५वी -तालुक्यात १० वी व जिल्ह्यात ३९८ वी ),विराज विनायक क्षीरसागर ( ५वी -तालुक्यात १६वा व जिल्ह्यात ५६५ वा ),स्वराज जगन्नाथ आंधळे (८वी - तालुक्यात ३रा व जिल्ह्यात ७८वा) ,स्वराज तुकाराम गायकर( ८वी -तालुक्यात १०वा व जिल्ह्यात २५२ वा ) या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मिलिंद खेत्री (विभाग प्रमुख- ५वी ),संतोष कांबळे,विशाल चौधरी,लक्ष्मण दुडे,सोनाली माळवे,आशा गाडेकर,शिल्पा भालेराव,सोनाली कांबळे ,अनिल जवरे (विभाग प्रमुख-८वी ),भगवंता घोडे ,अजित डांगे,मंगेश तांबे,दिनेश ताठे ,सरस्वती भताने ,रसिका शेळके आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप, प्रतीक अकोलकर,संजय हिरे,अजित डांगे यांनी अभिनंदन केले.

## अध्यक्षपदी श्री मनोज डहाळे बिनविरोध निवड सर्वत्र अभिनंदन



नेवासे शहर (स. गांवकरी) : नेवासे शहरातील व्यापारी(गोल्ड व्हॅल्यूवर)श्री. मनोज डहाळे यांची सुवर्णकार संघटनेच्या नेवासे अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सुवर्णकार संघटनेची गुरुवारी बैठक पार पडली. यावेळी सर्वानुमते मनोज डहाळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. व्यवसायातील उत्कृष्ट अनुभव, सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग व सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची कार्यपद्धती लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर मनोज डहाळे यांनी सांगितले की, "सुवर्णकार बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी व संघटना अधिक मजबूत करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करेन. सुवर्णकार समाजासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नशील राहील त्यांच्या निवडीबद्दल नेवासे शहर व तालुक्यातील व्यापारी वर्ग, सुवर्णकार बांधव व विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची सदिच्छा भेट



बिलोली (स. गांवकरी) : देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघ हा कर्नाटक–तेलंगणा सीमावर्ती भागात असल्याने,या भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसंदर्भात व विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सीमावर्ती भागात शांतता, कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत मा. पोलीस महासंचालकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच संबंधित विभागास आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## बदला अभी बाकी है, पूर्वांचल भुला नहीं!




मुंबई (स. गांवकरी) : ॲमेझॉन एमएक्स प्लेयर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज रक्तांचल सीझन 3 च्या लक्षवेधी ट्रेलरचे अनावरण केले. या ट्रेलरने आतापर्यंतच्या प्रेक्षक-पसंतीच्या गुन्हेगारी फ्रँचायझीच्या सर्वात गुंतवणून ठेवणाऱ्या सीझनची निर्मिती केली आहे. रितम श्रीवास्तव दिग्दर्शित, सिद्धार्थ मिश्रा लिखित आणि जार मोशन पिक्चर्स निर्मित, आगामी सीझनमध्ये क्रांती प्रकाश झा, निकितिन धीर, करण पटेल, माही गिल, राजेश कुमार आणि विक्रम कोचर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पूर्वांचलच्या खडतर पार्श्वभूमीवर घडणाऱ्या नवीन सीझनमध्ये सूड, महत्त्वाकांक्षा, नाजूक युती आणि कट्टर विश्वासघाताचे वर्चस्व असलेल्या जगाचा सखोल वेध घेतला आहे. जिथे प्रत्येक निर्णयाला किंमत मोजावी लागते. रक्तांचलचा तिसरा सीझन दिनांक 16 जुलैपासून केवळ ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर स्ट्रीम होईल.

# १० हजारांची लाच घेताना सहाय्यक निबंधक एसीबीच्या जाळ्यात

### सहकार विभागात खळबळ

### जिल्हा बँकेच्या ठरावाच्या प्रकरणात घेतली लाच

अहिल्यानगर: (स. गांवकरी)



जिल्हा बँकेच्या निवडणुकी संदर्भातील ठरावाच्या प्रकरणात निर्णय देण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना कर्जत येथील सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक (वर्ग-२) मिलिंद प्रल्हादराव राऊत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील सहकार विभागात मोठी खळबळ उडाली असून, विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांमध्येही या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.

या प्रकरणातील तक्रारदार हे एका विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार कोणाला द्यायचा, यासाठी सोसायटीचा ठराव मंजूर करून तो सहाय्यक निबंधकांकडे सादर करण्यात आला होता. मात्र, पुणे येथे वास्तव्यास असलेल्या एका संचालकाला बैठकीची नोटीस न मिळाल्याने त्यांनी ठरावाला विरोध करत सहाय्यक निबंधकांकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवर निर्णय सोसायटीच्या बाजूने लावण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी सहाय्यक निबंधक मिलिंद राऊत यांनी सुरुवातीला २५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. त्यापैकी १० हजार रुपये त्यांनी यापूर्वी स्वीकारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. उर्वरित १५ हजार रुपयांसाठी वारंवार मागणी होत असल्याने संबंधित सचिवांनी ९ जुलै रोजी अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी १० जुलै रोजी करण्यात आली. त्यावेळी तडजोडीनंतर उर्वरित रकमेतून १० हजार रुपये स्वीकारण्यास आरोपी अधिकाऱ्याने सहमती दर्शवली. त्यानुसार एसीबीने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताच पथकाने सहाय्यक निबंधक मिलिंद राऊत यांना रंगेहात पकडून अटक केली. ही कारवाई नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे आणि कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वाखाली अंमलदार संतोष शिंदे, वैभव सुपेकर, बाबासाहेब कराड आणि हारूण शेख यांनी सापळा यशस्वी केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सविता तांबे करत आहेत.

सचिव भरती, बदल्या आणि इतर प्रशासकीय प्रक्रियांबाबत काही संघटनांनी विविध आरोप केले असले, तरी या आरोपांबाबत संबंधित यंत्रणांकडून अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या दाव्यांची सत्यता तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

या कारवाईनंतर सहकारी संस्थांमधील सचिवांकडून अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या कथित त्रासाबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. काही सचिवांनी सहकार विभागातील कामकाजात पारदर्शकता आणण्याची तसेच अशा प्रकारच्या प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## दिव्यातील बेतवडे ग्रामस्थांचे मॅरेथॉन बिल्डर्स विरोधात एल्गार




ठाणे : (स. गांवकरी)

दिवा परिसरातील बेतवडे गावातील शेतकऱ्यांनी मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड कंपनीचे बिल्डर मयूर रमणीकलाल शहा, सागर गाला आणि त्यांच्या भागीदारांविरोधात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. ५० हून अधिक शेतकरी जमिनीचा गेल्या दहा वर्षांपासून जमीन व्यवहाराच्या मोबदल्यापासून वंचित असून त्यांची फसवणूक करण्यात आली असल्याने सदर बिल्डरच्या कार्यालयासमोर हे आंदोलन शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून मॅरेथॉन नेक्सवर्ल्डच्या कार्यालयासमोर, बेतवडे, दिवा (ठाणे ) येथे सुरू करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी नागरिकांना आणि घर खरेदीदारांना संबंधित प्रकल्पाबाबत सावध राहण्याचे आवाहन केले आहे. माहितीनुसार दिवा शहराजवळील बेतवडे गावातील सुमारे ४५ ते ५० शेतकऱ्यांच्या जमिनींचे व्यवहार करूनही अनेकांना करारानुसार मोबदला देण्यात आलेला नाही. काही शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय बांधकाम व सदनिका विक्री केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी अनेक वेळा पोलीस व लोकप्रतिनिधींकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रकरणी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे आणि आमदार सुलभा गायकवाड यांच्याकडेही निवेदने देण्यात आले आहे.

### आषाढी वारीच्या परतीच्या प्रवासातील परंपरा आणि वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाखरी येथे ७ दिवसांत

## सर्व्हिस रोड पूर्ण करण्याची खासदार प्रणिती शिंदे यांची NHAI कडे मागणी

सोलापूर : (स. गांवकरी)



आषाढी वारी २०२६ च्या परतीच्या प्रवासादरम्यान वारकऱ्यांची सुरक्षितता अबाधित राहावी तसेच शतकानुशतके सुरू असलेली वाखरी येथील पालखी मुक्कामाची परंपरा कायम राखली जावी, यासाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रत्यक्ष वाखरी येथील परतीच्या प्रवासातील पालखी मुक्काम स्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) पंढरपूर येथील प्रकल्प अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा करून सर्व्हिस रोडचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. त्यानंतर प्रकल्प संचालकांना निवेदन देऊन वाखरी (ता. पंढरपूर) येथे सर्व्हिस रोडचे काम युद्धपातळीवर मंजूर करून अवघ्या सात दिवसांत पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, आषाढी वारीदरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह विविध पालख्यांचा मुक्काम व रिंगण सोहळे वाखरी येथे पार पडतात. आषाढी एकादशी व पौर्णिमेनंतर परतीच्या प्रवासातही पालख्यांचा पहिला मुक्काम वाखरी येथे होत असून ही अनेक वर्षांची पवित्र व ऐतिहासिक परंपरा आहे.

मात्र, वाखरी परिसरात सुरू असलेल्या नव्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे गावाकडे जाणारा मूळ रस्ता बंद झाला असून गावात प्रवेश करण्यासाठी किंवा पालख्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेला सर्व्हिस रोड अद्याप तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे वारकऱ्यांसमोर मोठ्या अडचणी निर्माण झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

सर्व्हिस रोड नसल्यामुळे पालख्या, दिंड्या आणि लाखो वारकऱ्यांना गावात व पालखी तळावर पोहोचणे अत्यंत कठीण होणार असून त्यामुळे परतीच्या पहिल्या मुक्कामाची परंपरा खंडित होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच महामार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे वारकरी, भाविक आणि पालखी सोहळ्याच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला असून मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी दूरध्वनीवरील चर्चेदरम्यानही खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गांभीर्याने हाताळण्याची आवश्यकता अधोरेखित करत, परतीच्या वारीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत सर्व्हिस रोडचे काम पूर्ण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

या पार्श्वभूमीवर आषाढी वारी २०२६ च्या परतीच्या प्रवासापूर्वी वाखरी येथे सर्व्हिस रोडचे काम तातडीने मंजूर करून युद्धपातळीवर अवघ्या सात दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला द्यावेत, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे केली आहे. यावेळी उपसरपंच श्री संग्राम गायकवाड, माजी सरपंच नवनाथ मदने, गंगाधर भाऊ गायकवाड, सुभाष सुरवसे, बाळासाहेब लेंगरे, दत्ता जगताप, पोपट गायकवाड, शिवाजी गाजरे, प्रकाश शिंदे आकाश आवताडे ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पुराच्या पाण्यातून आदिवासी कुटुंबाची सुटका !

नारायणगाव : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यात गेले आठवडाभर पडत असलेल्या संततधार पावसामुळे बुधवार दिनांक आठ जुलै रोजी वडज धरणातून सकाळी सहा वाजता मीना नदीमध्ये बारा हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. जलसंपदा विभागाने आधीच पाणी सोडण्याचा इशारा दिलेला असूनही या वाढलेल्या पाण्यामुळे नदीकाठच्या सखल भागांमध्ये पाणी शिरून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

मीना नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर असलेल्या वारुळवाडीत हद्दीत वेताळबाबा मंदिर परिसरातही पुराचे पाणी शिरून येथे वस्तीला असलेल्या चार बिऱ्हाडातील सुमारे अठरा आदिवासी मच्छिमार कुटुंबातील लोक पाण्याने वेढले गेले. ही बाब सकाळी आठ वाजता काही ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर तातडीने बचाव कार्य सुरू करण्यात आले. पोलीस पाटील व आपदामित्र सुशांत भुजबळ, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, ग्रामपंचायत कर्मचारी रवी डोंगरे यांनी तात्काळ तिथे पोहोचून सदर कुटुंबातील लहान मुले व महिला यांना तातडीने पाण्याच्या बाहेर काढले. कमरेपेक्षा अधिक साचलेल्या पाण्यातून जमेल तितक्या जीवनावश्यक आवश्यक वस्तूही बाहेर काढण्यात आल्या, तसेच या कुटुंबांची पाळीव जनावरे मोठ्या शिताफिने पाण्यातून बाहेर काढून त्यांचाही जीव वाचविण्यात आला. वारुळवाडी ग्रामपंचायतचे प्रशासक विनायक भुजबळ व ग्राम महसूल अधिकारी वर्षा लांडे यांनी या कुटुंबातील आजारी व्यक्तींसाठी स्ट्रेचरची व्यवस्था करून त्यांना रुग्णवाहिकेतून दवाखान्यात भरती केले. या कुटुंबाचे अन्य धान्य व इतर खाद्य सामग्री पूर्णपणे पाण्यात बुडाल्यामुळे तसेच त्यांची राहण्याची सोय नसल्यामुळे त्यांना चिमणवाडी येथील रेणुका माता मंदिरात तात्पुरता आसरा देण्यात आला आहे तसेच त्यांच्या दोन्ही वेळच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. नारायणगाव पोलीस स्टेशनचे सपोनि प्रवीण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दत्ता ढेंबरे यांनी या संपूर्ण बचाव कार्यावर देखरेख ठेवून ते व्यवस्थित पार पडेल याची दक्षता घेतली.

याप्रसंगी वारुळवाडीचे अनेक युवक व तलाठी कार्यालयाचे कर्मचारी शुभम बनकर, सागर डोके यांनी बचाव कार्यात मदत केली.

## उपसरपंचपदी संतोष पादीर यांची बिनविरोध निवड

वडगाव आनंद: (स. गांवकरी)



वडगाव आनंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदावरून गणेश भुजबळ यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी झालेल्या निवडणुकीत संतोष पादीर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. गणेश भुजबळ यांनी वैयक्तिक कारणास्तव उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेले पद भरण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभा बोलावण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच रेलिकाताई जाधव या होत्या.तर ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे यांनी मतदानाची प्रक्रिया पुर्ण केली. सभेत उपसरपंच पदासाठी संतोष पादीर यांच्या नावाचा एकमेव प्रस्ताव दाखल झाला. इतर कोणताही उमेदवार नसल्याने त्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर नवनिर्वाचित उपसरपंच संतोष पादीर यांनी ग्रामपंचायतीच्या विकासासाठी सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करण्याचे आश्वासन दिले. गावातील पाणी, रस्ते, स्वच्छता आणि शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवू, असे ते म्हणाले. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतोष पादीर यांच्या निवडीबद्दल गावातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# आळंदीतून आजोळघरी माऊलींचे पालखी सोहळ्यास पाहुणचारासह निरोप

### गांधीवाड्यात पालखी सोहळ्यात हरिजागर ; भाविकांची दर्शनास गर्दी

आळंदी : (स. गांवकरी)

लाखो वैष्णव भक्तांचे मांदियाळीने भगव्या पताका उंचावत आळंदीहून उद्योगनगरी मार्गे पुण्यनगरीकडे माऊलींचा पालखी सोहळा भल्या पहाटे हरिनाम गजरात मार्गस्थ झाला. अलंकापुरीतील जुना श्रीपादबुवा गांधी वाडा आणि राम वाड्याचे जागेत नव्याने विकसित दर्शनबारी मंडप आजोळघरी (गांधीवाडा) माऊलींचे पालखी सोहळ्याने पहिल्या मुक्कामात श्रीक्षेत्रोपाध्ये श्रींचे पुजारी माजी नगराध्यक्ष सुरेश गांधी, माजी नगरसेवक सुधीर गांधी परिवारासह आळंदीकरांचा पाहुणचार घेतला. श्रींचे वैभवी पालखी सोहळ्याने गुरुवारी (दि.९) दोन दिवसांचे मुक्कामासाठी पुण्यनगरीकडे प्रवासास सुरुवात केली. पंढरी जाण्यास आळंदीकरांचा हृदयस्पर्शी निरोप गांधीवाड्यातून तसेच नगरपरिषद चौकातून निरोप दिला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पुण्यनगरीत दोन दिवस विसावणार असून शनिवारी ( दि. ११) दिवेघाट मार्गे सासवड ला निघेल.

आळंदीतील एक दिवसाचे मुक्कामा नंतर श्रीचे सोहळ्यास निरोप देण्यासाठी आळंदीकर धाकट्या पादुका, थोरल्या पादुका मंदिरा पर्यंत लहानग्यासह आले होते. सोहळ्यात सुमारे बत्तीस दिवसांचा विरह आळंदीकरांना सहन करावा लागणार असल्याने माऊलींना निरोप देताना अनेकांचे नेत्रांच्या कडा पान्हावल्या. तर अनेकांचे हृदय भरून आले होते. माऊली मंदिरात तसेच पहिल्या एक दिवसाचे मुक्कामासाठीचे नियोजन देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, निलेश महाराज लोंढे, रोहिणी पवार, योगी निरंजननाथ, व्यवस्थापक माऊली वीर, तुकाराम माने, श्रीधर सरनाईक यांचेसह सेवक कर्मचारी यांनी केले. पोलीस, महसूल प्रशासन, मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केलेल्या सूचना प्रमाणे कामकाज करीत नियोजन केले. गेल्या चार दिवसांपासून आळंदीत वैष्णवांचा हरिनामाचा गजर चालू होता. गुरुवारी पहाटे भाविकांना आजोळघरातील माऊलींच्या पादुकांचे दर्शन पालखीसह रथातून झाले. आजोळघरी गांधी कुटुंबीयांच्या वतीने रुद्राभिषेक आणि पादुका पूजन करण्यात आले. त्यांच्या वतीने नैवेद्य दाखविण्यात आला. देवस्थानच्या वतीने पहाट पूजा आणि आरती झाली. यानंतर उर्जितसिंह शितोळे सरकार यांच्या वतीने माऊलींना प्रथा परंपरेने नैवेद्य वाढविण्यात आला. दरम्यान आळंदीकर ग्रामस्थ माऊलींची पालखी खांद्यावर उचलण्यासाठी पहाटे पासून सज्ज झाले होते. श्रीची पालखी आजोळघरातून आळंदीकर ग्रामस्थ, खांदेकरी यांनी खांद्यावर घेत श्रींचे रथात ठेवली. माऊली - माऊली नामाच्या गजरात



व "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल"च्या नामजयघोषात पालखी नगरपालिका चौकातून नवीन पुलावरून पुढे पुण्याकडे हरिनाम गजरात मार्गस्थ झाली. तत्पूर्वी स्व. माजी नगराध्यक्ष नानासाहेब गरुड यांचे वतीने सुदीप गरुड आणि गरुड परिवाराने लक्षवेधी पुष्प सजावटीने सजलेल्या वैभवी चांदीचे रथात पालखी ठेवली. आळंदी पालिकेच्या वतीने देवस्थान समिती, मालक, चोपदार, दिंडीकरी या मानकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी आळंदी नरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे यांचे सह नगरपरिषद, महसूल अधिकारी, आरोग्य अधिकारी, आळंदी नगरपरिषदेचे माजी पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### आळंदीत भाविकांना बुंदी प्रसाद वाटप

आरोग्य सेवा माउलीचे वैभवी पालखी सोहळ्यास भावपूर्ण निरोप देत आळंदीत येथील समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, जय भगवान प्रतिष्ठानचे वतीने बिस्कीट वाटप झालं

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय आयुक्त विनयकुमार चौबे यांचे नियंत्रणात आळंदीत पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, पोलिस नाईक मच्छिंद्र शेंडे आदींचे माध्यमातून बंदोबस्त लावण्यात आला होता.

दरम्यान, आळंदीतील प्रदक्षिणा मार्ग, पालिका चौक, देहू फाटा, चोविसावाडी, वडमुखवाडी या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी माउलींच्या पालखी रथाचे तसेच पालखीतील पादुकांचे दर्शनासाठी तसेच सोहळ्यास निरोप देण्यासाठी मोठी गर्दी केली होती. पंचक्रोशीतील महिला, पुरुष, लहान मुले माउलींच्या रथासोबत चालत होते. दरम्यान, विविध मंडळे, संघटनांच्या वतीने सोहळ्यातील वारकऱ्यांना चहा, पोहे, गुडदाणी, पाणी वाटप उत्साहात करण्यात आले. या वर्षी पुलाचे कठडे महापुराने तुटल्याने देखभाल दुरुस्ती सुरु असल्याने पुलाचे दुतर्फा मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# तुकाराम मुंढे यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी असताना केलेले नियम आजही कायम

## तुकाराम मुंढेंनी सांगितला पंढरपूरच्या VIP दर्शनाचा 'तो' किस्सा

सोलापूर : (स. गांवकरी)


एफ डी ए आयुक्त तुकाराम मुंढे हे सोलापूर चे जिल्हाधिकारी होते. त्यावेळी त्यांनी देवसामान्यांच्या दर्शनासाठी काही नियम बनविले होते ते नियम पंढरपूर मधील श्री विठ्ठल मंदिरात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीचे होते ते नियम आज ही जैसे थे लागू आहेत. याबद्दल तुकाराम मुंढेंयांनी सोलापूर चे जिल्हाधिकारी असतानाच्या काही गोष्टीने उजाळा दिला. त्यांनी पंढरपूरच्या VIP दर्शनाचा ' एक' किस्सा सांगितला. त्यांनी सांगितले की, २८ तासांची रांग थेट १४ तासांवर, आणली ती कशी आणली हे देखील सांगितले. तुकाराम मुंढें जे निर्णय घेतात ते जनतेच्या हिताचे असतात म्हणुन त्यांच्या प्रत्येक निर्णयांची पुन्हा चर्चा होत असते.

तुकाराम मुंढे म्हणाले, विठ्ठल थकला आहे असं तो म्हणत नाही"; असे म्हणत त्यांनी पंढरपूर मंदिरातील किस्सा सांगितला.

वारीच्या पार्श्वभूमीवर तुकाराम मुंढे सध्या पुन्हा चर्चेत आले आहेत.

शिस्तबद्ध स्वभाव, कठोर निर्णयक्षमता आणि कडक कार्यपद्धतीमुळे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे हे नेहमीच चर्चेत असतात. सध्या राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून त्यांनी राज्यभरात राबवलेल्या कारवायांमुळे अन्न माफियांवर मोठा आळा बसल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे, महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा असलेल्या आषाढी वारीलाही सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर तुकाराम मुंढे यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील व्हीआयपी दर्शन आणि भाविकांच्या सोयीसाठी घेतलेल्या निर्णयांचे दोन जुने किस्से पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांनी एका खाजगी वाहिनी ला दिलेल्या मुलाखतीत मुंढे यांनी हे किस्से सांगितले होते. तुकाराम मुंढेंचा पहिला किस्सा:





"रांगेतील शेवटच्या भाविकाला दर्शन होईपर्यंत मंदिर बंद होणार नाही" तुकाराम मुंढे यांनी सांगितलेला पहिला किस्सा पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या दर्शन व्यवस्थेशी संबंधित आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी विठ्ठल मंदिर रात्री ११ वाजता बंद केले जायचे आणि सकाळी ४ वाजता पुन्हा उघडले जायचे. त्यामुळे रात्री ११ वाजेपर्यंत ज्यांना दर्शन मिळाले नाही, त्या भाविकांना पहाटेपर्यंत थांबावे लागायचे.

ही व्यवस्था पाहिल्यानंतर मुंढे यांनी मंदिर समितीकडे यामागचे कारण विचारले. त्यावर त्यांना "हा वेळ विठ्ठलाच्या विश्रांतीसाठी असतो" असे उत्तर देण्यात आले. यावर मुंढे यांनी प्रतिप्रश्न केला, "हे ज्याला विश्रांती घ्यायची आहे त्याने ठरवले आहे की तुम्ही ठरवले आहे? विठ्ठल असे म्हणत नसेल की मी आता थकलो आहे, उद्या दर्शन घ्या. त्यामुळे मंदिर २४ तास खुले राहिले पाहिजे." यानंतर त्यांनी बैठक घेऊन स्पष्ट निर्देश दिले की, "कसल्याही परिस्थितीत रांगेत शेवटचा भाविक उभा असेपर्यंत मंदिर बंद होणार नाही." या निर्णयामुळे पंढरपूरच्या मंदिरात फोफावलेली व्हीआयपी दर्शन संस्कृती मोडीत निघाली आणि सामान्य भाविकांना मोठा दिलासा मिळाला.

तुकाराम मुंढेंचा दुसरा किस्सा : "आषाढी वारीत २८ तासांची प्रतीक्षा १४-१६ तासांवर" तुकाराम मुंढे यांनी सांगितलेला दुसरा किस्सा आषाढी वारीतील दर्शन व्यवस्थेबाबतचा आहे. आषाढीच्या काळात पंढरपुरात दोन ते तीन लाख भाविकांची गर्दी असते. अनेकांना दर्शनासाठी तब्बल २८ ते ३५ तास रांगेत उभे राहावे लागायचे. मुंढे यांनी एवढा वेळ का लागतो, याची चौकशी केली असता त्यांना सांगण्यात आले की, रात्री १२ वाजता मंदिर बंद झाल्यानंतर साफसफाई केली जाते. त्यानंतर मंदिर समितीच्या अध्यक्षांच्या हस्ते पूजा, मग मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजा आणि त्यानंतरच भाविकांना दर्शनासाठी प्रवेश दिला जातो. या संपूर्ण प्रक्रियेसाठी ४ ते ५ तास खर्ची पडत होते.

यावर मुंढे यांनी निर्णय घेतला की, या पूजा वेगवेगळ्या न होता एकत्रच पार पाडल्या जातील. या एका निर्णयामुळे जवळपास २ तासांची बचत झाली. परिणामी, ज्या भाविकांना दर्शनासाठी २८ तास प्रतीक्षा करावी लागायची, त्यांचे दर्शन १४ ते १६ तासांत होऊ लागले.

### वारीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा चर्चेत आलेले किस्से

आषाढी वारीला सुरुवात झाल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी सांगितलेले हे दोन्ही किस्से पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. पंढरपूरसारख्या मोठ्या धार्मिक स्थळी सामान्य भाविकांना केंद्रस्थानी ठेवून घेतलेले निर्णय आणि व्हीआयपी संस्कृतीला दिलेला आळा यामुळे मुंढे यांच्या कार्यपद्धतीची आजही चर्चा होताना दिसत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## फिनोलेक्स पाईप्स, मुकुल माधव फाउंडेशनची सामाजिक बांधिलकी दृढ

- चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वारकरी सेवा अभियानाचे उद्घाटन
- जीवनावश्यक वस्तू, रेनकोट वाटप व आरोग्य शिबिरासह हरित वारीसाठीही पुढाकार

पुणे (स. गांवकरी) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना होत असताना राज्यभरातून लाखो वारकरी आळंदी आणि देहूमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पंढरपूर वारीशी फिनोलेक्स पाईप्सने गेली तीन दशके जपलेले सामाजिक बांधिलकीचे नाते यंदा अधिक दृढ केले आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू पी. छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. आठशे वर्षांहून अधिक काळापासून पांडुरंगाच्या भेटीसाठी शेकडो किलोमीटर पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी यंदा फिनोलेक्स पाईप्सक आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सुमारे पाच लाख जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येत आहे. यामध्ये तीन लाखांहून अधिक युटिलिटी बॅग, ५० हजार पावसाळी कुंचे (घोंगते), ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी आधाराच्या काठ्या तसेच इतर आवश्यक साहित्याचा समावेश आहे. वारी मार्गावर विविध ठिकाणी आयोजित मोफत वैद्यकीय शिबिरांतून आरोग्य तपासणी, तज्ज्ञांचा सल्ला, औषधे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा पुरविली जात आहे.



## 'ग्रोथ सेंटर्स' आर्थिक विकासाला, रोजगारनिर्मितीला पूरक ठरतील

- डॉ. अभिजित चौधरी यांचे प्रतिपादन
- प्रोफेशनल रियल्टर्स असोसिएशन ऑफ पुणेतर्फे 'प्रॉप कनेक्ट २०२६' राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

पुणे (स. गांवकरी) : "पुढील २० वर्षांच्या नियोजित विकासासाठी संरचनात्मक विकास आराखडा (स्ट्रक्चरल प्लॅन) तयार करण्यात येत असून, लवकरच त्याचा मसुदा तयार होईल. त्याचा अंतिम आराखडा १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विकासाच्या विकेंद्रीकरणासाठी नीती आयोग आणि महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून पुण्यात १८ 'ग्रोथ सेंटर्स' उभारण्यात येत आहेत. मेट्रो स्थानकांच्या परिसरासह काही निवडक भागांमध्ये विशिष्ट संकल्पनावर आधारित विकसित होणारी ही केंद्रे रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला पूरक ठरतील," असे प्रतिपादन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी केले. दी प्रोफेशनल रियल्टर्स ऑफ पुणे (प्रॉप) आणि नॅशनल असोसिएशन ऑफ रियल्टर्स-इंडिया (नार-इंडिया) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रॉप कनेक्ट २०२६' या देशातील सर्वात मोठ्या एकदिवसीय रियल इस्टेट सल्लागार परिषदेचे उद्घाटन डॉ. चौधरी यांच्या हस्ते झाले. हॉटेल जेडब्ल्यू मॅरिएट पुणे येथे झालेल्या कार्यक्रमावेळी 'पीएमआरडीए'च्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, क्रेडाई पुणेचे अध्यक्ष मनीष जैन, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अतुल चोरडिया, 'नार-इंडिया'चे चेअरमन एमिरेट्स रवी वर्मा, चेअरमन सुमंत रेड्डी, चंद्रेश विठलानी, आशिष मेहता, तरुण भाटिया, समीर अरोरा, 'प्रॉप'चे अध्यक्ष उदयन माने, 'प्रॉप कनेक्ट २०२६'चे संयोजक रमेश तोष्णीवाल, 'प्रॉप'चे संस्थापक सदस्य किशन मिलानी, माजी अध्यक्ष दर्शन चावला, उपाध्यक्ष तनुज नगरानी व नीरज सिंग, सचिव मनीष दीडमिसे, खजिनदार मुरली रमनी, संचालक दिनेश राठी, सारंग मद्रेवार, महेश यादव, रवींद्र यादव, विक्रम मलिक, प्रीत कोहली, बांधकाम व्यावसायिक विनीत गोयल, आकाश अग्रवाल, डॉ. मोहित रामसिंघानी, विशाल जुमानी, सागर अग्रवाल आदी उपस्थित होते. देशातील ३८ शहरांतील दोन हजारांहून अधिक रियल्टर्स आणि ३०० हून अधिक विकसक सहभागी झाले होते. डॉ. अभिजित चौधरी म्हणाले, "पुढील २० वर्षांचा संरचनात्मक विकास आराखडा तयार करताना झोनिंगपेक्षा रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, टेकड्या आणि 'नो डेव्हलपमेंट' क्षेत्रांच्या संरक्षणावर भर दिला जाणार आहे. प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ हा पुण्याच्या विकासाला नवी गती देणारा ठरेल. मेट्रो मार्गिका तीनवरील पहिल्या १२ स्थानकांवर या महिन्याअखेरीस सेवा सुरू होईल, तर संपूर्ण मार्ग २०२६ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

# बदलत्या आर्थिक ध्येयांसाठी 'फ्लेक्सी ड्रीम प्लॅन'

- संरक्षण, लवचिकता आणि संपत्ती निर्मितीचा संगम
- एडलवाइस लाइफचा नवीन सहभागी बचत जीवन विमा आराखडा
- दीर्घकालीन आर्थिक नियोजनाला बळ

पुणे : (स. गांवकरी)

आयुष्यातील बदलत्या गरजा आणि आर्थिक ध्येयांचा विचार करून एडलवाइस लाइफ इन्शुरन्सने 'फ्लेक्सी ड्रीम प्लॅन' हा सहभागी बचत जीवन विमा (पार्टिसिपेटिंग सेव्हिंग्ज लाइफ इन्शुरन्स) आराखडा सादर केला आहे. संरक्षण, लवचिकता आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मिती यांचा समतोल साधणारा हा आराखडा ग्राहकांना त्यांच्या विविध आर्थिक उद्दिष्टांची प्रभावीपणे पूर्तता करण्यासाठी मदत करणार असल्याचे कंपनीने सांगितले. घर खरेदी, मुलांच्या शिक्षणासाठी निधी, निवृत्तीचे नियोजन, अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत निर्माण करणे किंवा कुटुंबासाठी आर्थिक वारसा तयार करणे अशा विविध उद्दिष्टांसाठी एकाच योजनेत पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ग्राहकांच्या बदलत्या गरजांनुसार हा आराखडा लवचिकपणे वापरता येणार आहे. याबाबत माहिती देताना एडलवाइस लाइफ इन्शुरन्सचे चीफ डिस्ट्रिब्युशन ऑफिसर अनूप सेठ म्हणाले, "आज ग्राहक एकाच वेळी अनेक आर्थिक ध्येयांचा पाठपुरावा करत आहेत. त्यामुळे संरक्षणासोबतच उत्पन्नातील लवचिकता आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता देणाऱ्या उपायांची गरज वाढली आहे. फ्लेक्सी ड्रीम प्लॅन हीच गरज लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे." या योजनेत 'माइलस्टोन ऑप्शन' आणि 'लिव्हलॉंग ऑप्शन' असे दोन पर्याय उपलब्ध आहेत. माइलस्टोन पर्याय विशिष्ट आर्थिक उद्दिष्टांसाठी निधी उभारू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी उपयुक्त असून, लिव्हलॉंग पर्याय निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाची गरज असलेल्या व्यक्तींसाठी तयार करण्यात आला आहे.

# मुलगा आणि सूनेविरूद्ध डॉ. उमा वळसंगकर यांची न्यायालयात धाव

सोलापूर : (स. गांवकरी)

रेल्वे लाईन्स परिसरातील नामांकित 'एसपी न्यूरो सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल एलएलपीच्या जागेचा आणि मालकी हक्काचा कौटुंबिक व व्यावसायिक वाद आता दिवाणी न्यायालयात पोचला आहे.



हॉस्पिटलच्या भागीदार डॉ. उमा शिरीष वळसंगकर यांनी मुलगा डॉ. अश्विन, सून डॉ. शोनाली, सूनेचे वडील डॉ. दिलीप जोशी व आई रिता जोशी यांच्याविरुद्ध दिवाणी न्यायालयात 'निरंतर ताकीदीसाठी' (कायमस्वरूपी मनाईहुकूम मिळणेबाबत) दावा दाखल केला आहे. त्यावर आज (गुरुवारी) सुनावणी होती. आता १६ जुलैला पुढील सुनावणी होणार आहे.

न्यायालयात दाखल दाव्यानुसार ईरण्णा वस्तीतील (रामवाडी) ५५,००० चौरस फुटाची व्यापारी इमारत माझ्या व दिवंगत पती डॉ. शिरीष यांच्या संयुक्त मालकीची होती. डॉ. शिरीष यांनी १७ ऑगस्ट २०२० रोजी केलेल्या मृत्यूपत्रानुसार त्यांच्या निधनानंतर पत्नी म्हणून मालमत्तेचा ताबा माझ्याकडे आला. सध्या तेथे एसपी न्यूरो सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल भाडेपट्ट्याने चालवले जाते. ज्यात डॉ. उमा वळसंगकरांसह मुलगी नेहा फडके व जावई डॉ. सुजय फडके भागीदार आहेत. यात प्रतिवादी डॉ. शोनाली, डॉ. दिलीप जोशी यांचा हॉस्पिटलशी कोणताही कायदेशीर संबंध नाही. तरी, त्यांनी हॉस्पिटलच्या तिसऱ्या मजल्यावरील डॉक्टर्स, कर्मचारी, भागिदारांच्या आराम व निवासाच्या ठिकाणी बेकायदा प्रवेश केला. तिथे आरडाओरडा करून, असभ्य भाषा वापरून रुग्णालय व्यवस्थापनात अडथळा आणला.

आम्ही आमची ओपीडी येथे सुरूच करणार' अशी धमकी माझ्यासह कर्मचाऱ्यांना दिली. डॉ. शोनाली व इतरांकडून मालमत्तेच्या शांततामय उपभोगात आणि हॉस्पिटलच्या कामकाजात वारंवार अडथळा निर्माण केला जात आहे. त्यामुळे न्यायालयाने त्यांना रुग्णालयाच्या जागेत बेकायदेशीर प्रवेश करण्यास आणि अडथळा आणण्यास कायमची मनाई (ताकीद) करावी, अशी विनंती या दाव्याद्वारे डॉ. उमा यांनी केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी न्यायालयीन प्रक्रियेनुसार होणार आहे.

(१) मुलगा डॉ. अश्विन व सून डॉ. शोनाली मे २०२५ पासून वेगळे राहतात. डॉ. शोनाली वडिलांकडे राहते, तिने इतरत्र डॉक्टरकीचा व्यवसायही सुरू केला आहे. ती कधीही हॉस्पिटलचा भाग नव्हती. हॉस्पिटलमध्ये कधीही डॉक्टर, स्टाफ नव्हत्या. त्यामुळे 'एसपी न्यूरो सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल एलएलपी'शी त्यांचा कोणताही संबंध नाही.

(२) १८ जून २०२६ रोजी डॉ. शोनालीने पूर्वपरवानगीशिवाय रुग्णालयातील तिसऱ्या मजल्यावरील निवासस्थानात बेकायदा घुसखोरी केली. २७ जूनला मी तेथील साहित्य, भांडी आणायला गेल्यावर डॉ. शोनालीने दरवाजा उघडला नाही. दुसऱ्या दरवाजातून आत जाताना उद्धट वर्तन करून खोलीत येण्यास मज्जाव केला. त्यातून ज्येष्ठ नागरिक म्हणून मला मानसिक त्रास व यातना झाल्या.

(३) डॉ. शोनालीच्या आई-वडिलांनीही अरेरावीची भाषा वापरून त्याठिकाणी ओपीडी सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना निरंतर ताकीद द्यावी. माझ्या कब्जातील मालकीच्या जागेच्या वहिवाटीस ते यापुढेही अडथळा करण्याची दाट शक्यता आहे.

(४) दाव्यातील डॉ. अश्विन वळसंगकर हा नाममात्र पक्षकार म्हणून समाविष्ट केले असून त्यांच्याविरुद्ध कोणतीही मागणी नाही. त्यांनी हल्लीचेकामी हजर व्हावे अगर कसे, याचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. त्यांच्या खर्चासाठी मी जबाबदार नाही.

# सोलापुरात पुन्हा "श्रेय" घेण्यावरून वाद!

## खा. प्रणिती शिंदे v/s आ. देवेंद्र कोठे! यांच्यात श्रेय वॉर सुरू

सोलापूर : (स. गांवकरी)

खरं तर दोघांनाही "श्रेय" दिले पाहिजे, पण... अधिक कोणाला आणि थोडं कोणाला? द्यायचे हे महत्वाचे आहे.

सोलापुरात सध्या पुन्हा एकदा "श्रेय" घेण्यावरून जोरदार वाद पेटलाय. निमित्त आहे 'B2' च्या प्रलंबित प्रश्नाचं! आमदार देवेंद्र कोठे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्यात रंगलेल्या या श्रेयवादावर 'शिवबाराजे न्यूज'ने थेट आणि रोखठोक विश्लेषण केले आहे. सोलापूरच्या विकासाच्या या कामाचे श्रेय दोघांनाही दिले पाहिजे, पण आता प्रश्न उरतो की 'अधिक' श्रेय कोणाचे?

हा प्रश्न आजचा नाही. मा. सुशीलकुमार शिंदे यांच्या काळापासून, विष्णूपंत कोठे यांच्या काळापासून ते आजतागायत खासदार प्रणिती शिंदे या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत आहेत.



मा. सुशीलकुमार शिंदे | मा. विष्णूपंत कोठे | खा. प्रणिती शिंदे

कित्येक वर्षांची ही तपश्चर्या आहे आणि हा मूळ प्रश्न मांडलाच मुळी शिंदे परिवाराने!

आमदार देवेंद्र कोठे हे जेमतेम १८ महिन्यांचे आमदार आहेत. प्रकरण जेव्हापासून प्रलंबित होतं, तेव्हा सत्ताधारी आमदार म्हणून कोठे यांनी बैठक घेतली, पाठपुरावा केला आणि तो प्रलंबित प्रश्न निकाली काढला, हे मान्य! पण, सध्या ज्या प्रकारे आमदार देवेंद्र कोठे या B2 च्या निर्णयाचा 'घवघवा' करत आहेत, तो अतिरेक वाटू लागलाय.

> "अरे बाबा, तुम्ही जेव्हा 'चड्डी' घालत होता, तेव्हापासून शिंदे परिवार या प्रश्नाचा पाठपुरावा करतोय! आणि कोठे परिवाराने मा. सुशीलकुमार शिंदे यांच्याच कृपेने, त्यांच्याच हाताखाली राजकारणाचे धडे गिरवलेत, हे विसरून कसं चालेल? 'सगळं मलाच पाहिजे, श्रेय फक्त माझंच' हा आमदार कोठेंचा स्वभाव यावरून उघड होतो."



स्वतः राज्याचे महसूल मंत्री मा. बावनकुळे साहेब सभागृहात सुशीलकुमार शिंदे साहेबांचं नाव घेतात आणि खासदार प्रणिती शिंदेंना स्वतः फोन करून "अभिनंदन" करतात; यातच सगळं आलं! यावरूनच कोणाचे योगदान किती मोठे आहे आणि कोणाचा स्वभाव कसा आहे, हे सोलापूरकरांना वेगळं सांगण्याची गरज नाही.

श्रेय वादाचे राजकारण बाजूला ठेवून, सोलापूरच्या जनतेचा प्रलंबित प्रश्न सुटला हे महत्त्वाचे आहे. .



# शाश्वत आर्थिक विकासासाठी व्यापक इनोव्हेशन गरजेचे

निगडी (पुणे) : (स. गांवकरी)

"देशाचा शाश्वत आर्थिक विकास साधायचा असेल, तर इनोव्हेशन केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजाभिमुख, सर्वसमावेशक आणि व्यापक व्हायला हवे. ग्रामीण भाग, महिला, स्वयं-सहाय्यता गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि तळागाळातील उद्योजकांना सक्षम करणारी नवोन्मेषाची परिसंस्था उभारणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडचे (एमकेसीएल) संस्थापक संचालक विवेक सावंत यांनी केले. नीती आयोग, अटल इनोव्हेशन मिशन, देसाई ब्रदर्स लिमिटेड आणि ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या अटल सामाजिक नवोन्मेष केंद्राचे (एसीआयसी) उद्घाटन विवेक सावंत यांच्या हस्ते झाले. प्रसंगी अटल इनोव्हेशन मिशनचे अधिकारी आशिष पांडे व दीपाक्षी जिंदल, देसाई ब्रदर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश पारेख, सीएसआर हेड डॉ. चंद्रकांत रावळ, ज्ञान प्रबोधिनीचे विश्वस्त सुभाष देशपांडे, निगडी केंद्राचे प्रमुख मनोज देवळेकर, 'एसीआयसी'चे संस्थापक संचालक यशवंत लिमये व संगीता कुलकर्णी, मुख्य नवोपक्रम अधिकारी ॐकार गुर्जर आदी उपस्थित होते.

# पाल आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे धनुर्विद्येत सुवर्णवेध

## जळगाव जिल्हा धनुर्विद्या असोसिएशन व सातपुडा विकास मंडळाचा कडक शिस्तीत सराव!

रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील सातपुडा विकास मंडळाच्या वतीने पाल येथील लि.ना. पाटील आश्रमशाळा आणि द.न. वांद्रेकर माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सुरू असलेल्या , धनुर्विद्या प्रशिक्षण ,

सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. आदिवासी बहुल भागातील या विद्यार्थ्यांमधील उपजत क्रीडा कौशल्याला अचूक दिशा देण्यासाठी ही संस्था गेल्या एका वर्षापासून अहोरात्र मेहनत घेत आहे.

दुर्गम भागातील या मुलांनी क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घ्यावी, या उद्देशाने या मुलांकडून , अत्यंत



कडक शिस्तीत सराव करून घेतला जात आहे. घरचा तथा शाळेतील अभ्यास सांभाळून एकूण २२ विद्यार्थी व विद्यार्थिनी रोज नियमित ३ तास या मैदानावर घाम गाळत आहेत. विशेष म्हणजे, रविवारी सुट्टीच्या दिवशीही विश्रांती न घेता या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण अविरत सुरू असून , त्यांच्यातील कमालीची जिद्द अधोरेखित करते. याकामी

असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्यांची लाभतेय मोठी साथ .

या क्रीडा चळवळीला यशस्वी करण्यासाठी जळगाव जिल्हा धनुर्विद्या असोसिएशन सावदा (ता. रावेर) चे संपूर्ण कार्यकारी मंडळ मैदानात उतरले आहेत. असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिरीष मधुकरराव चौधरी आणि उपाध्यक्ष राजेश मोतीराम कोल्हे ,यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली हे खेळाडू तयार होत आहेत. संस्थेचे सचिव व प्रशिक्षक रायमल धुमर्सिंग भिलाला हे या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन पाहत असून, असोसिएशनचे सभासद सदस्य राजेश गजानन वानखेडे, अजित खुशाल पाटील, अविनाश राजधर महाजन ,आणि सुधाकर नामदेव झोपे, मूख्यध्यापक भागवत पारधी,गोविंदा अत्तरदे

हे सर्वजण या आदिवासी खेळाडूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून , त्यांना सातत्याने प्रोत्साहन देत आहेत. असोसिएशनच्या या भक्कम पाठिंब्यामुळे आणि प्रत्यक्ष मैदानावर प्रशिक्षण कोच, मार्गदर्शक प्रशिक्षक आणि वर्ग शिक्षक घेत असलेल्या छान मेहनत यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आदिवासी क्षेत्रातील या मुलांच्या हातातील धनुष्यबाण आता केवळ परंपरेपुरता मर्यादित न राहता, आधुनिक धनुर्विद्येच्या (आर्चरी) माध्यमातून थेट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर धडक मारण्यासाठी सज्ज होत आहे. या कौतुकास्पद उपक्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या चिकाटीचे संपूर्ण रावेर तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. शिरीष चौधरी यांचे विचार या उपक्रमाबद्दल बोलताना असोसिएशनचे अध्यक्ष माजी आमदार शिरीष चौधरी म्हणाले, "आदिवासी मुलांमध्ये नैसर्गिक गुण आणि अचूक वेध घेण्याची कला जन्मतःच असते. त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्यास ते जागतिक पातळीवर चमकू शकतात. आमचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सातपुडा विकास मडंळ या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कटिबद्ध असून, या २२ खेळाडूंमधून उद्याचे ऑलिम्पिकवीर घडावेत हाच आमचा ध्यास आहे."

# फुलांनी बहरल्या काकडीच्या वेली; पण फळंच नाही आली!

- रायखोडच्या शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचे सावट ;
- शेतकऱ्यांची कृषी विभागाकडे तक्रार



भोकर : (स. गांवकरी)

तालुक्यातील रायखोड येथील पाच ते सहा शेतकऱ्यांनी कमी कालावधीत चांगले उत्पादन मिळेल, या अपेक्षेने काकडीची लागवड केली. दर्जेदार बियाणे, ठिबक सिंचन, खते, औषधांची फवारणी आणि वेळोवेळी मशागत करून काकडीच्या वेली जोमाने वाढल्या. फुलधारणा देखील भरघोस झाली; मात्र फळधारणा होत नसल्याने काकडी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. काकडीमध्ये ९६% पाणी असल्याने उन्हाळ्यात मानवी शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते तसेच त्यात मोठ्या प्रमाणात जीवनसत्व फायबर हे उपयुक्त घटक असल्याने बाजारात काकडीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्याच अनुषंगाने रायखोड येथील शेतकरी भगवान बुट्टनवाड, नागेश नागमोड यांच्यासह अन्य चार शेतकऱ्यांनी नांदेड येथील गोदावरी कृषीसेवा केंद्र व कृषीराज एजन्सी येथून काकडीचे बियाणे खरेदी करून लागवड केली. एकरी हजारो रुपयांचा खर्च करूनही वेलीवरील फुले गळणे, फळधारणा न होणे किंवा फळेच न लागणे, या समस्यांमुळे उत्पादन हाती आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, केलेले कष्ट वाया गेल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

उत्पादनाच्या अपेक्षेने घेतलेले कर्ज, वाढलेले बियाणे, खते, कीडनाशके आणि मजुरीचा खर्च यामुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण अधिक वाढला आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी तालुका कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली असून, कृषी विभागाने तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त काकडी उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शनासह आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. "घाम गाळूनही हाती काहीच लागत नसल्याने शेती करावी की नाही," असा हताश सवाल आता काकडी उत्पादक शेतकरी उपस्थित करत आहेत.




ठाणे : दिवा शहर व परिसरातील रिक्षा प्रवाश्यांना मासिक पास योजना तर रिक्षा चालकांना अतिरिक्त उत्पन्नाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'विरा फाउंडेशन व शिवशक्ती रिक्षा युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या रिक्षाचालकांना नियमित व्यवसायासोबतच मासिक पासधारक प्रवाशांना सेवा देण्याची संधी मिळणार आहे. या योजने अंतर्गत दिवा स्टेशन ते साबेगाव, मुंब्रादेवी कॉलनी, दातिवली, गणेश नगर, आगासन, खर्डीगाव, शिळफाटा आदी परिसरातील प्रवाशांसाठी मासिक पास उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## थोडक्यात बातम्या...



### रमामाता आंबेडकर चौक येथे जड वाहनांना बंदी, लोखंडी कमान कार्यान्वित

नवीन नांदेड (स. गांवकरी) : सिडको परिसरातील नागरी वसाहती मधुन भरधाव जाणाऱ्या येणाऱ्या चारचाकी ट्रक टिपर सह मोठ्या जड वाहनांना माता आंबेडकर चौक ढवळे कॉर्नर येथे लोखंडी कमान बसविण्यात आल्यामुळे मोठ्या वाहनांना प्रतिबंध करण्यात आला आहे यासाठी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी या साठी सातत्याने पुढाकार घेऊन अखेर या ठिकाणी लोखंडी कमान बसविली आहे. नांदेड ते ऊस्मानगर रोड,एम आयडीसी कॉर्नर ते माता रमामाता आंबेडकर चौक मार्ग सिडको ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर मोठ्या प्रमाणात ट्रक टिपर डिंपर सह अनेक मोठ्या गाड्या भरधाव वेगाने ये जा करीत असत तर सिडको भागातील वसाहतीत नागरिक युवक जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात जात येत असत, त्यामुळे पदाचारी व शालेय विद्यार्थी यांना जड वाहनांना मुळे दहशत निर्माण झाली होती तर संबंधित ठिकाणी लावण्यात आलेली लोखंड कमान अज्ञात वाहनाने तोडल्याने पुन्हा या भागातुन मोठ्या प्रमाणात जड वाहनाने भरधाव वेगाने धावू लागले,अखेर या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक यांनी बांधकाम विभाग व संबंधित गुत्तेदार मार्फत पुन्हा 8जुले रोजी लोखंडी कमान कार्यान्वित केली आहे. या ठिकाणी जड वाहनाना दिसण्यासाठी लालपट्टी रेडियम वापर करण्यात आला आहे. या लोखंडी कमानमुळे परिसरातील दुचाकी,तीन चाकी,सह छोट्या चार चाकी वाहनांसह शालेय विद्यार्थी सह जेष्ठ नागरिक व युवक महिलांना दिलासा मिळाला आहे.

### आष्टी गटातील शेतकऱ्यांसाठी 75 नवीन रोहित्रे बसवावीत

तामसा (स. गांवकरी) : जिल्हा परिषद आष्टी गटातील अनेक गावांतील कृषीपंपांसाठी असलेली रोहित्रे ओव्हरलोड झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. दिवसातून 10-12 वेळा वीज खंडित होत असून कमी व्होल्टेजमुळे शेतकऱ्यांच्या मोटारी वारंवार जळत आहेत,येणाऱ्या रब्बी हंगामात शेतकऱ्यांची ही गंभीर समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी मुंबई येथे राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री सौ. मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात आष्टी गटातील ओव्हरलोड झालेल्या रोहित्रांऐवजी 75 नवीन डी.पी. तात्काळ मंजूर करून बसविण्याची मागणी करण्यात आली,शेतकऱ्यांच्या प्रश्नाची तातडीने दखल घेत राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी महावितरणच्या संचालकांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत,महावितरणच्या स्तरावरून याबाबत लवकरच कार्यवाही सुरू होणार असून आष्टी गटातील शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

### नांदेड येथील विष्णुपुरी उड्डाणपुलाच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी

- दोषींवर कडक कारवाई केली जाईल - पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : "अनिल पाटील धमने" नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील विष्णुपुरी येथे श्री गुरुगोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील उड्डाणपुलाच्या बाजूचा खालचा भाग अचानक कोसळल्याच्या घटनेची शासनाने गंभीर दखल घेतली असून, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशीत बांधकामातील त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील निष्काळजीपणा अथवा संबंधित यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारची हयगय झाल्याचे आढळल्यास जबाबदारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. घटनेनंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी तातडीने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. उड्डाणपुलाची संरचनात्मक स्थिरता तपासून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. या घटनेच्या तांत्रिक चौकशीसाठी केंद्रीय पातळीवरील तज्ज्ञांची टीम दिल्लीहून उद्या नांदेड येथे दाखल होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तातडीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेत त्यांनी उड्डाणपुलावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तात्काळ राबविण्यात आल्या. रस्त्यावर पडलेला मलबा जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आला तसेच पर्यायी मार्गाने वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही केली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.

# लेंन्डी प्रकल्प : मुखेड-कंधारच्या विकासाला वेग

## ३ राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आणि एमआयडीसी, रेल्वे मार्ग नकाशावर मतदारसंघ प्रगतीच्या नव्या पर्वात

देगलुर : (स. गांवकरी)

मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघात विकास कामांना अभूतपूर्व गती मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आमदार डॉ. तुषार राठोड यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लागले असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

मतदारसंघातील तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असलेले लेंन्डी प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने वेगाने जात आहे. या प्रकल्पासाठी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा करून आवश्यक मंजुरी व निधी मिळवून दिला. त्यामुळे



भविष्यात हजारो हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी आमदार राठोड यांनी तीन राष्ट्रीय महामार्गांची मंजुरी मिळवून दिली. आणि त्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या महामार्गांमुळे मुखेड-कंधार परिसराचा राज्यातील प्रमुख शहरांशी संपर्क अधिक सुलभ झाला असून व्यापार, उद्योग आणि वाहतूक क्षेत्राला चालना मिळत आहे. मुखेड मतदारसंघात एमआयडीसी मंजूर करून आणि रेल्वे मार्ग नकाशावर आणणे हे त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाचे यश मानले जात आहे. या औद्योगिक वसाहतीमुळे हजारो सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मतदारसंघातील विविध गावांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, शैक्षणिक सुविधा आणि इतर मूलभूत कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे अनेक गावांचा चेहरा-मोहरा बदलत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी अनेक गावांपर्यंत पक्के रस्ते मंजूर करण्यात आले असून दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

या सर्व विकास कामांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून "आमदार असावा तर डॉ. तुषार राठोड यांच्यासारखा कार्यसम्राट असावा" अशा प्रतिक्रिया मतदारसंघातून व्यक्त होत आहेत.

लेंन्डी धरण,तीन राष्ट्रीय महामार्ग, एमआयडीसी आणि गावागावांतील पायाभूत सुविधा विकास कामांमुळे मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघ प्रगतीच्या नव्या पर्वात प्रवेश करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

# 'वृद्धाश्रम ही काळाची गरज बनणे खेदजनक' : पूज्य महंत रामगिरी महाराज

वडाळा महादेव : (स. गांवकरी)

भक्ती, शक्ती आणि अध्यात्माचा त्रिवेणी संगम असलेल्या श्री क्षेत्र सराला बेट पायी दिंडी सोहळ्याचे माऊली वृद्धाश्रम येथे अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. हा सोहळा 'मातृरक्षा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या मंगलप्रसंगी उपस्थित भाविकांना संबोधित करताना परमपूज्य महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज यांनी समाजातील सद्यस्थितीवर मार्मिक भाष्य केले. महाराज म्हणाले की, "मानवी जीवनात संस्कार आणि शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. वास्तविक पाहता 'वृद्धाश्रम' ही संकल्पनाच आपल्या संस्कृतीत नसावी. परंतु, दुर्दैवाने अलीकडच्या काळात वृद्धाश्रम ही केवळ गरजच नाही, तर एक 'फॅशन' बनत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे." वैदिक पद्धतीने पाद्यपूजन व शंखनाद दिंडीचे आगमन होता ही संपूर्ण परिसर विठूनामाच्या गजराने दुमदुमून गेला. आश्रमाच्या वतीने सौ. कल्पनाताई वाघुंडे आणि महिला मंडळाच्या सुवासिनींनी पूज्य महाराजांचे व संतांचे मनोभावे पाद्यपूजन केले. पुरोहित गिरीश टंकसाळे यांनी केलेल्या मंत्रोच्चारात आणि पवित्र शंखनादाने पारंपरिक वैदिक पद्धतीने दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. सोहळ्याचे औचित्य साधून सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्रीमती उज्वलाताई श्रीराम भोसले यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. विश्वस्त मधुकर महाराज कडलग, ह.भ.प. दत्तात्रय महाराज बहिरट, महंत रघुनंदनगिरीजी महाराज आणि डॉ. कोते यांच्या हस्ते माऊली वृद्धाश्रमाचे अध्यक्ष सुभाष वाघुंडे यांचा सन्मान करण्यात आला.

# "जागतिक लोकसंख्या दिन" सप्ताहाचे आयोजन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- "दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर" हे असणार यंदाचे घोषवाक्य



राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नांदेड जिल्हा व महानगरपालिका क्षेत्रात ११ ते १८ जुलै २०२६ या कालावधीत "जागतिक लोकसंख्या दिन" सप्ताह अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या वर्षीच्या मोहिमेसाठी केंद्र व राज्य शासनातर्फे "दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर" हे मुख्य घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश केवळ अनपेक्षित गर्भधारणा टाळणे इतकाच मर्यादित नसून, माता व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कुटुंब नियोजनाचे महत्त्व जनमानसात रुजविणे हा आहे. कुटुंब नियोजनाच्या सेवांच्या अनुपलब्धतेमुळे वाढणारी अनावश्यक गर्भधारणा, माता मृत्यू तसेच नवजात बालकांच्या आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या लोकसंख्या सप्ताहामध्ये आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये खालील प्रमुख सेवा व योग्य समुपदेशन उपलब्ध करून दिले जाणार आहे. आधुनिक तात्पुरत्या पद्धती: यामध्ये अंतरा इंजेक्शन, छाया गोळ्या, तांबी (IUD) व इतर साधनांचा समावेश आहे. कायमस्वरूपी पद्धती: पुरुष व महिलांसाठी सुरक्षित नसबंदी शस्त्रक्रिया. तातडीचे समुपदेशन व आपत्कालीन सेवातरी नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आणि पात्र लाभार्थ्यांनी आपल्या कुटुंबाच्या व माता-बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांनी केले आहे .

# श्री सत्यसाईबाबांच्या रथासह चरण पादुकांचे प्रस्थान

नेवासा : (स. गांवकरी)



प्रेमावतार भगवान श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रथमच आंध्रप्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील पुट्टपूर्ती येथून अहिल्यानगर जिल्ह्यात आलेल्या श्रीसत्यसाईबाबांच्या रथासह चरण पादुकांचे श्री क्षेत्र देवगड येथे छत्रपती संभाजीनगरकडे प्रस्थान झाले. यावेळी नगर जिल्ह्यातील साईभक्त निरोप देताना भावूक झाले होते.

नगर जिल्ह्यातील भाविकांनी श्रध्दायुक्त अंतःकरणाने पादुका पूजनाचा सहकुटुंब आनंद घेतला. ठिकठिकाणी साईभक्त दर्शनासाठी मोठी गर्दी करू लागले. पादुका रूपाने प्रत्यक्ष श्रीसत्यसाईबाबाच आपल्या भेटीला आले आहेत, हा श्रद्धाभाव भाविकांमध्ये होता. जिल्हाभर श्रीसत्यसाईंच्या रथयात्रेसह दिव्य पादुकांची आतुरतेने प्रतिक्षा केली जात होती.

श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख श्री.अशोक कुरापाटी यांनी जिल्ह्यातील नियोजन उत्तम केले असल्याने सर्वधर्मीय भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. नगर शहरातील नंदनवन लॉन्समधून निघालेली रथयात्रा आयुर्वेद कॉर्नर, नेप्ती नाका, दिल्लीगेट, सारडा कॉलेज, प्रेमदान चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, कुष्ठधाम रोड, श्रमिक नगर, भिस्तबाग नाका, पाईपलाईन रोड, श्रीराम चौक, दसरे नगर अशा नगर शहरातील विस्तारीत उपनगरांमधून मिरी येथे आली. सरदार मिरीकर वाड्यातील दत्त मंदिरात रथयात्रेतील पादुकांचे पूजन ॲड. गौरव मिरीकर आणि अमेय मिरीकर यांनी केले. यावेळी ॲड गोविंदराव मिरीकर, सौरभ मिरीकर, श्रीमती रंजना मिरीकर, सौ. कांचन मिरीकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. येथून श्री क्षेत्र देवगड येथे रथयात्रा मुक्कामी पोहोचली. १९६८-६९ साली नगर शहर आणि मिरी येथे श्री सत्यसाई सेवा समितीची स्थापना झाली. मानव सेवा हीच ईश्वरी सेवा हे ब्रीद समोर ठेवून गेली ५८ वर्षे या समितीच्यावतीने अध्यात्मिक, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक सेवा कार्य सातत्याने सुरू आहे. त्यात अध्यात्मिक प्रबोधन, भजन, बालविकास, आरोग्य शिबीरे, निराधारांना मदत, अन्नदान, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्य हे सर्व श्रीसत्यसाईबाबांचे दिव्य संदेश आणि शिकवणुकीप्रमाणे साईभक्त सेवाभावी वृत्तीने करत आहेत. प्रत्येकालाच श्रद्धेच्या ठिकाणी जाऊन श्रीगुरूचरणी नतमस्तक होणे शक्य नसते. रथयात्रेमुळे श्री स्वामी स्वतः आपल्या गावी आले. आपल्या घरी आले, हा श्रद्धाभाव दिसून आला.

देवगड मधील श्री दत्त मंदिर संस्थानचे मठाधिपती हभप भास्करगिरी महाराज यांनी पादुकांचे पूजन केले. श्रीसत्यसाईबाबा असताना पुट्टपूर्ती येथे मी गेलो होतो, ही आठवण भास्करगिरी महाराजांनी सांगितली. देवगडमध्ये विविध भागामधून आलेल्या भाविकांनी पादुका दर्शनाचा लाभ घेतला. साईभक्तांनी भजनाचा आनंद लुटला.

श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख श्री.अशोक कुरापाटी यांच्या हस्ते राज्याचे रथप्रमुख व छत्रपती संभाजीनगर जिल्हा समितीचे अध्यक्ष श्री. विकास लोळगे यांच्याकडे पुढील मार्गक्रमणासाठी झेंडा सुपूर्द करून हस्तांतरण सोहळा संपन्न झाला. यावेळी नगर जिल्ह्यातील साईभक्तांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या तर संभाजीनगरचे साईभक्त स्वामी आपल्याकडे आले म्हणून आनंदीत झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील रथयात्रेच्या यशस्वी संयोजनासाठी श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख अशोक कुरापाटी,अध्यात्मिक प्रमुख प्रा.ज्योती कुलकर्णी, अमोल सप्तर्षी, डॉ.शामसुंदर केकडे,अँड. रावसाहेब मिरीकर, नानासाहेब मिरीकर, स्वाती मिरीकर, नंदलाल व नलिनी भालेराव, नरसिंग व शोभा दुसा, अनिल व रेखा शर्मा, दिलीप मेहेर, ज्योती श्रोत्री, विलास नडिमेटला, विजय चावक, फुलचंद भळगट, शकुंतला पाटील, श्रीकृष्ण धर्माधिकारी, नितीन भंडारी, प्रा. काथार, रूक्मिणी संदुपटला, राजश्री राऊत, श्रुती केकडे आदि साईभक्तांनी अविश्रांत परिश्रम घेतले.

# बोगस बियाण्यांमुळे शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात

- तात्काळ नुकसानभरपाई द्या
- आ. अंतापूरकरांची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

बिलोली : (स. गांवकरी)



देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघासह राज्यातील अनेक भागांत खरीप हंगामात बोगस व निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून त्यांच्यावर आर्थिक, मानसिक आणि शारीरिक ताण वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी आ. अंतापूरकर यांनी राज्याचे कृषीमंत्री मा. ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आ. अंतापूरकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या विश्वासाने विविध पिकांची पेरणी केली. मात्र बोगस व निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे अनेक ठिकाणी उगवण अत्यंत कमी झाली किंवा झालीच नाही. परिणामी शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करावी लागत असून त्यासाठी अतिरिक्त खर्चाचा मोठा बोजा सहन करावा लागत आहे. आधीच वाढते उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा, मजुरीचे वाढलेले दर आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. कृषी विभागाकडून बियाण्यांच्या गुणवत्तेची प्रभावी तपासणी आणि बाजारपेठेवर आवश्यक नियंत्रण न ठेवल्यामुळे बोगस बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. हा प्रकार केवळ निकृष्ट बियाण्यांचा नसून शेतकऱ्यांच्या विश्वासाशी आणि त्यांच्या उपजीविकेशी झालेला गंभीर अन्याय असल्याचे त्यांनी नमूद केले. निवेदनात बुस्टर, रवी सिड्स, विगोर, ग्रिनगोल्ड, ओसवाल सिड्स, पार्श्व सिड्स, बुस्टर प्लान्ट जेनेरिक्स, ग्रीन टीप सिड्स, सफल सिड्स, पार्शर जेनेटिक्स, श्री श्री सिड्स आणि हायरिच (Hirich) या कंपन्यांच्या बोगस किंवा निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे दुबार पेरणी करावी लागलेल्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ विशेष आर्थिक मदत जाहीर करून ती दुबार पेरणीसाठी आवश्यक असलेली उच्च दर्जाची, प्रमाणित आणि उगवणक्षम बियाणे मोफत उपलब्ध करून द्यावीत.

दोषी बियाणे उत्पादक कंपन्या, वितरक आणि संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, परवाने रद्द करावेत आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई संबंधित कंपन्यांकडून वसूल करून बाधित शेतकऱ्यांना द्यावी."शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. बोगस बियाण्यांमुळे झालेले नुकसान हे केवळ आर्थिक नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी," अशी ठाम मागणी आ. अंतापूरकर यांनी राज्याचे कृषीमंत्री मा. ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# विधान भवनात रिंग रोड बाधित शेतकऱ्यांचा आवाज

## मंत्र्यांसमोर भ्रष्टाचाराचा पर्दाफाश, न्यायासाठी तातडीची कारवाई करण्याची मागणी

मुंबई (स. गांवकरी)

छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने विधान भवन येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले तसेच मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन नाशिक रिंग रोड प्रकल्पातील गंभीर अनियमितता,कथित भ्रष्टाचार आणि शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाकडे लक्ष वेधत सविस्तर निवेदन सादर केले.



शिष्टमंडळाने मंत्र्यांना सांगितले की,सध्या सुरू असलेल्या नाशिक रिंग रोड प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा संशय असून काही शासकीय अधिकारी,बिल्डर आणि प्रभावशाली व्यक्तींच्या फायद्यासाठी मूळ नियोजनात बदल करण्यात आले आहेत.त्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने भूसंपादनात घेतल्या जात असून शेतकऱ्यांवर मोठा अन्याय केला जात आहे.

विशेषतः मखमलाबाद,मातोरी, मुंगसारा,जलालपूर,महादेवपूर,चांदशी आणि गोवर्धन या गावांमधील रिंग रोडचे अलाइनमेंट जाणीवपूर्वक बदलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.या बदलामुळे शेतकऱ्यांची घरे,विहिरी, शेडनेट,पॉलिहाऊस,व्यावसायिक दुकाने तसेच इतर बांधकामे मोठ्या प्रमाणावर बाधित होत असून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांनी सुरुवातीपासून गवळवाडी मार्गे रिंग रोड करण्याची मागणी सातत्याने केली होती. मात्र,काही अधिकारी आणि बिल्डर यांच्या फायद्यासाठी हा मार्ग बदलण्यात आल्याचा आरोप शिष्टमंडळाने केला.तसेच विंचूर गवळी परिसरात विकास आराखडा (DP Plan) न पाळता चुकीच्या पद्धतीने अलाइनमेंट निश्चित करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

याशिवाय वडनेर दुमाला आणि विहितगाव परिसरात मोठे हायटेन्शन टॉवर अस्तित्वात असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून महापालिका व एमएसआयडीसीच्या चुकीच्या नियोजनामुळे तेथील शेतकऱ्यांनाही अन्यायकारक अलाइनमेंटचा फटका बसत असल्याचे सांगण्यात आले. रिंग रोडच्या नियोजनाची जबाबदारी असलेल्या काही अधिकाऱ्यांनी स्वतः त्या परिसरात जमिनी खरेदी करून अलाइनमेंटमध्ये बदल केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच सारूळ,पाथर्डी,पिंपळगाव बहुला,माडसांगवी,बेलगाव ढगा यांसह रिंग रोडमधील सर्व बाधित गावांमध्ये एमएसआरडीसी व जिल्हा प्रशासनाकडून अत्यंत कवडीमोल दराने जमिनी संपादित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे शिष्टमंडळाने मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

**शेतकऱ्यांनी यावेळी पुढील प्रमुख मागण्या केल्या:**

* मखमलाबाद ते गोवर्धन दरम्यानचे विद्यमान अलाइनमेंट रद्द करून गवळवाडी मार्गे रिंग रोड तयार करण्यात यावा.
* भूसंपादन कायदा २०१३ नुसार संबंधित गावांमधील मागील तीन वर्षांतील उच्चतम खरेदी व्यवहाराचा आधार घेऊन योग्य मोबदला निश्चित करण्यात यावा.
* ज्या ठिकाणी गुणांक १ लागू करण्यात आला आहे,तेथे गुणांक २ लागू करण्यात यावा.
* सर्व बाधित जमिनींचे फेरसर्वेक्षण करून ज्या जमिनींची चुकीने जिरायती नोंद झाली आहे,त्या बागायती म्हणून नोंदवाव्यात.
* सर्व फळझाडे, विहिरी, शेडनेट, पॉलिहाऊस व इतर मालमत्तेची अचूक मोजणी करून त्यांचा योग्य मोबदला तातडीने देण्यात यावा.

या सर्व मागण्यांवर तात्काळ निर्णय घेऊन रिंग रोड बाधित शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि त्यांच्यावर होणारा अन्याय थांबवावा,अशी ठाम भूमिका शिष्टमंडळाने मंत्र्यांसमोर मांडली. यावेळी माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार नाना पटोले यांचे भेट घेत त्यांनाही सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने मागण्यांचे निवेदन देण्यात आले तसेच विजय वडेट्टीवार त्यांनी ज्या पद्धतीने शेतकऱ्यांची लक्षवेधी मांडली शासनाला न्याय देण्यासाठी व चौकशीची मागणी करून शेतकऱ्यांच्या या लढ्याला ताकद देण्याच्या काम केले त्यांचे सुद्धा सर्व रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त केले.

> काल मंत्रिमहोदयांशी भेट झाल्यानंतर त्यांनी नाशिक रिंग रोडच्या संदर्भात चौकशीचे आदेश दिलेले आहेत हे फक्त आदेश न राहता त्याची अंमलबजावणी व्हावी याच्या मध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर कडक अशी कारवाई करण्यात यावी शेतकरी सिस्टमंडळाबरोबर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस आणि संबंधित सर्व मंत्री अधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांवर अंतिम तोडगा काढण्यात यावा अन्यथा शेतकरी अधिक आक्रमकपणे आंदोलन करून आपला न्याय मिळवतील.
>
> **- करण गायकर, संस्थापक अध्यक्ष छावा क्रांतिवीर सेना महाराष्ट्र राज्य**

# थोडक्यात पण महत्वाचे



## वृक्ष लागवडीबाबत आ. शेखर निकम यांची मागणी : शासन सकारात्मक

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा वृक्षलागवडीच्या रखडलेल्या कामाबाबत आमदार शेखर निकम यांनी पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले. महामार्गाच्या कामाला सुमारे १४ वर्षांचा कालावधी उलटूनही अनेक ठिकाणी वृक्षलागवड झालेली नसल्याचे निदर्शनास आणून देत, वृक्षलागवडीसोबतच त्या झाडांच्या संगोपनाची जबाबदारीही संबंधित कंत्राटदारांवर निश्चित करण्यात येणार का, असा महत्त्वपूर्ण प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रत्नागिरी जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात अनेक ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणप्रेमी स्वयंस्फूर्तीने वृक्षलागवड करत आहेत. कोकणातील अनेक नर्सरींमध्ये दोन ते तीन वर्षांची, दर्जेदार आणि चांगल्या वाढीची रोपे उपलब्ध आहेत. त्यामुळे महामार्गाच्या वृक्षलागवडीसाठी स्थानिक नर्सरींना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणीही आमदार निकम यांनी सभागृहात केली. या प्रश्नाला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गाच्या संबंधित कंत्राटदारांना वृक्षलागवडीबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी ट्री-गार्ड व इतर संरक्षणात्मक उपाययोजनांबाबत सूचना करण्यात येतील. तसेच वृक्षलागवडीसाठी कोणत्याही एका विशिष्ट नर्सरीची सक्ती केली जाणार नाही. कोकणातील स्थानिक नर्सरींसह मलकापूर येथील कृषी विद्यापीठाची नर्सरी तसेच राज्यातील इतर उपलब्ध नर्सरींमधूनही आवश्यकतेनुसार रोपे उपलब्ध करून दिली जातील, असे ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले. आमदार शेखर निकम यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे मुंबई-गोवा महामार्ग वृक्ष लागवड प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक नर्सरींना संधी, पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीचे दीर्घकालीन संगोपन या तिन्ही बाबींना चालना देण्याच्या दृष्टीने शासनाने व्यक्त केलेली भूमिका महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## आधार हाऊसिंग फायनान्सकडून विश्रांती कक्ष आणि जनजागृती उपक्रम



पुणे (स. गांवकरी) : सामाजिक कल्याण आणि सकारात्मक सामाजिक प्रभावासाठी आपली कटिबद्धता अधिक दृढ करत आधार हाऊसिंग फायनान्स पंढरपूर वारीमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांना त्यांच्या प्रवासातील अडचणी दूर करण्याकरिता विश्रांती कक्ष उभारले असून त्याचबरोबर जनजागृती उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत. दरवर्षी, लाखो वारकरी कडक ऊन आणि मुसळधार पावसाची पर्वा न करता विठ्ठलाच्या दर्शनासाठी अत्यंत कठीण प्रवास करतात, ज्यामधून त्यांचा दृढ विश्वास, स्थिरता आणि भक्तीचे दर्शन होते. या यात्रेतील शारीरिक श्रमाची जाणीव ठेवून आधार हाऊसिंग फायनान्सने वारकऱ्यांसाठी १०० विश्रांती कक्ष उपलब्ध करून दिले आहेत, जे यात्रेदरम्यान भाविकांना विश्रांतीची सुविधा देतात, ज्यामुळे ते आपली आध्यात्मिक यात्रा पुढे सुरू ठेवण्यापूर्वी काही वेळ आरामात विश्रांती घेऊ शकतील. सायंकाळी वारकरी विश्रांती घेत असतात, तेव्हा कंपनीने सर्जनशील पथनाट्याद्वारे शैक्षणिक जनजागृती उपक्रम देखील सुरू केला आहे. या उपक्रमासाठी खास लिहिलेले पथनाट्य एका कुटुंबाच्या प्रवासाभोवती फिरते, ज्यांचे स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न होते, पण पैशांच्या अभावामुळे त्यांना स्वप्न साकारताना काही अडचणींचा सामना करावा लागला. केवळ कठोर परिश्रम आणि योग्य आर्थिक मार्गदर्शनाच्या जोरावर ते कुटुंब आपले स्वप्न पूर्ण करण्यात कसे यशस्वी होते, हे या नाटकात दाखवले आहे. याव्यतिरिक्त, या पथनाट्याचे कव्हरेज प्रसिद्ध मराठी इन्फ्लुएन्सर चॅनेल भडिपा द्वारे केले जात आहे, जे वारकऱ्यांशी संवाद साधून, त्यांचा वारीचा अनुभव आणि त्यांच्या घरमालकीचा प्रवास समजून घेऊन हा उपक्रम अधिक लक्षवेधक बनवत आहे.

## भारतातील महिला उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षांना चालना




मुंबई (स. गांवकरी) : कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (“केएमबीएल”) ने आज कोटक बिझलॅब्सद्वारे समर्थित, एनएसआरसीईएलच्या 'वुमन स्टार्टअप प्रोग्राम' (“डब्ल्यूएसपी”) च्या पुढील आवृत्तीची घोषणा केली. कोटक महिंद्रा बँक लिमिटेडचा सीएसआर उपक्रम असलेला हा कार्यक्रम, कल्पनेपासून ते व्यवसायाच्या विस्तारापर्यंतचा प्रवास करणाऱ्या महिला संस्थापकांना महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन पाठिंबा देतो. हा कार्यक्रम टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील क्षमतांना वाव देण्यावर लक्ष केंद्रित करतो.

# कोका-कोलाने लॉस्ट व्हॉइसेसना बनवले मुख्य आवाज

पुणे : (स. गांवकरी)




कोका-कोलाची "द लॉस्ट व्हॉइसेस” ही भारतातील निस्सीम फुटबॉल चाहत्यांचा गौरव करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेली देशव्यापी मोहीम आहे. फिफा® वर्ल्ड कप सीझनच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेली ही मोहीम प्रबळ सांस्कृतिक सत्याला स्पर्श करते. भारताने १९५५ पासून या स्पर्धेत भाग घेतला नसला, तरी केरळपासून गोव्यापर्यंत आणि आसामपासून पश्चिम बंगालपर्यंतचे लाखो चाहते जागतिक संघांना अशाच उत्कट भावनेने पाठिंबा देण्यासाठी एकत्र येतात, जणू काही त्यांचा स्वतःचा देश मैदानावर खेळत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून कोका-कोला या निष्ठावान चाहत्यांचे कौतुक करणार आहे आणि संपूर्ण फिफा® वर्ल्ड कपदरम्यान ब्रँडच्या सोशल मीडिया फीडवर त्यांचे खरे, ओरडून बसलेले आवाज प्रदर्शित करणार आहे. ब्रँडच्या जागतिक "फील इट ऑल" प्लॅटफॉर्म अंतर्गत लाँच केलेली कोका-कोलाची "द लॉस्ट व्हॉइसेस” मोहीम ब्रँडच्या कथानकाच्या केंद्रस्थानी अस्सल उत्कटता ठेवून चाहत्यांच्या भावनेला सादर करते. कोका-कोला टीएम इंडिया आणि साऊथवेस्ट एशियाचे मार्केटिंगचे सीनियर डायरेक्टर कार्तिक सुब्रमण्यन म्हणाले, "फिफा® सोबत आमच्या प्रदीर्घ सहयोगाच्या माध्यमातून कोका-कोलाने नेहमी फुटबॉलमुळे निर्माण होणारी उत्कटता, जवळीक आणि सामायिक भावनांचा उत्सव साजरा केला आहे.

# पडघ्यात टोरेंट पॉवरच्या ढिसाळ कारभाराविरोधात शिवसेना (उबाठा) आक्रमक

भिवंडी : (स. गांवकरी)

- नियमित वीजपुरवठ्याची मागणी
- उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांचे टोरेंट पॉवरला निवेदन
- वारंवार वीज खंडित, पाणीपुरवठा, उद्योग व विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान

भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरात टोरेंट पॉवरकडून वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांनी टोरेंट पॉवर लिमिटेडच्या व्यवस्थापनाला सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनाद्वारे नियमित व अखंड वीजपुरवठा, तातडीची दुरुस्ती आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पडघा व परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरगुती ग्राहक, व्यापारी, लघुउद्योग, शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनियमित वीजपुरवठ्यामुळे दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत असून अनेक व्यावसायिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे. याशिवाय, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा विस्कळीत होत आहे. पाणी शुद्धीकरण यंत्रणा बंद पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक भागांत दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रकाश भोईर यांनी नियंत्रण कक्षाच्या कार्यपद्धतीवरही नाराजी व्यक्त केली आहे. तक्रार नोंदविण्यासाठी संपर्क साधणे कठीण जात असल्याने ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तसेच तक्रारींवर वेळेत कार्यवाही होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारणांची माहिती नागरिकांना पारदर्शकपणे देण्यात यावी, वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, फीडर आणि अन्य विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवून प्रत्येक तक्रारीवर तातडीने कार्यवाही करावी, पिण्याच्या पाण्याच्या योजना व बोअरवेलच्या वीजजोडण्या अखंडित ठेवण्यासाठी स्वतंत्र नियोजन करावे तसेच ग्राहकाभिमुख व उत्तरदायी सेवा देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशा प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. यावेळी प्रकाश भोईर यांनी इशारा देत सांगितले की, नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधित शासकीय प्राधिकरण, नियामक संस्था तसेच ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दाद मागण्यात येईल. पडघा व परिसरातील नागरिकांना अखंड, सुरक्षित आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, हीच या निवेदनामागील मुख्य भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या तक्रारीबाबत आमच्या प्रतिनिधीने टोरेंट पॉवरच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधला असता, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, मागील काही दिवसांत झालेल्या मुसळधार पाऊस आणि पूरपरिस्थितीमुळे पडघा व परिसरातील काही भागांतील वीज यंत्रणांवर परिणाम झाला होता. त्यामुळे काही ठिकाणी वीजपुरवठ्यात व्यत्यय निर्माण झाला. अशा परिस्थितीत आमच्या तांत्रिक पथकांनी युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे करून शक्य तितक्या लवकर वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न केले. ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचीही गंभीर दखल घेण्यात आली असून, निवेदनातील सर्व मुद्द्यांची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. भविष्यात अशा समस्या कमी करण्यासाठी देखभाल आणि तांत्रिक सुधारणा सुरू आहेत.

# मा. मंत्री डॉ. भारतीताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कळवण येथे SIR संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

कळवण : (स. गांवकरी)



कळवण येथील प्रशासकीय कार्यालयात आज भारतीय जनता पक्षाच्या नेत्या तथा माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारतीताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली SIR (Special Intensive Revision) संदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला सहायक जिल्हाधिकारी मा. कश्मीराजी संख्ये मॅडम, तहसीलदार रोहिदास वारुळे, गट विकास अधिकारी रमेश वाघ यांच्यासह विविध विभागांचे शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष विकास देशमुख, जिल्हा महामंत्री नंदकुमार खैरनार, माजी तालुकाध्यक्ष दादाभाऊ पगार, गोविंद कोठावडे, तालुकाध्यक्ष दीपक खैरनार दादाजी मोरे, अशोक पाटील, सतीश पगार, मुना काकुळते,नाना खैरनार,प्रविण रैदळ, रुपेश शिरोडे ,हेमंत रावले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथ लेव्हल एजंट (BLA) उपस्थित होते.

यावेळी डॉ. भारतीताई पवार यांनी मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेला अत्यंत गांभीर्याने घेण्याचे आवाहन केले.

पात्र मतदारांची नावे यादीत समाविष्ट होणे, चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे, स्थलांतरित किंवा मृत मतदारांच्या नोंदींबाबत नियमानुसार कार्यवाही करणे आणि प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत ही प्रक्रिया पोहोचविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासकीय अधिकाऱ्यांनी SIR प्रक्रियेतील विविध टप्पे, आवश्यक कागदपत्रे, अर्ज सादर करण्याची पद्धत, पडताळणी प्रक्रिया तसेच नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

BLA आणि पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक बूथवर जाऊन नागरिकांशी संपर्क साधत मतदार यादी शुद्ध, अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही करण्यात आले.

# चिमुकल्यांच्या मानवी साखळीने वेधून घेतले लक्ष!

नांदेड : (स. गांवकरी)

जागतिक लोकसंख्या वाढीशी संबंधित आव्हाने आणि संधींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. कुटुंब नियोजन, लिंग समानता, गरिबी, माता आरोग्य आणि शाश्वत विकास यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधतो. जागतिक लोकसंख्या दिन आपल्याला प्रत्येक व्यक्तीला आरोग्य, शिक्षण आणि पुनरुत्पादन आणि कौटुंबिक जीवनाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळावे याची खात्री करण्याची आपली सामूहिक जबाबदारीची आठवण करून देण्यासाठी जवळा दे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या चिमुकल्यांनी गावकऱ्यांचे लक्ष वेधले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, हैदर शेख, मनिषा गच्चे, संभाजी गवारे, सुषमा गोडबोले, अर्चना शिखरे आदिंची उपस्थिती होती. आता जागतिक लोकसंख्या आठ अब्जांपेक्षा जास्त झाली आहे. तर उपलब्ध आकडेवारीनुसार, मागील जनगणनेदरम्यान देशातील सुमारे १८ टक्के लोकसंख्या वाढली आहे. जर भारताची लोकसंख्या याच वेगाने वाढली असण्याची शक्यता आहे. येत्या दोन वर्षांत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल. असे झाले तर देशात अन्न संकट, बेरोजगारीचे संकट, वैद्यकीय आणि आरोग्य संकट, जलसंकट मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल. स्थलांतर, उपासमार यामुळे लोक हतबल होतील. नैसर्गिक समतोल भंग केल्यास भयंकर नैसर्गिक आपत्तींचा धोका निर्माण होईल, अशी माहिती मुख्याध्यापक ढवळे यांनी दिली. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात ११ ते १८ जुलै २०२६ या कालावधीत 'जागतिक लोकसंख्या दिन' सप्ताह राबविण्यात येत आहे.

# वाळूच्या बातम्यांच्या आडून खंडणीचा डाव?

## कोपरगाव तालुक्यात 'डिजिटल' पत्रकारांच्या नावाने वसुलीचे रॅकेट?

कोपरगाव : (स. गांवकरी)

कोपरगाव तालुक्यात वाळू वाहतुकीच्या नावाखाली एका शेतकऱ्याला कथितरित्या ब्लॅकमेल करून पैशांची मागणी केल्याचा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. स्वतःला पत्रकार आणि गोदावरी बचाव कृती समितीचा सदस्य म्हणवणाऱ्या एका तोतया पत्रकाराविरोधात सांगवी भुसार येथील शेतकरी अजय किसन जाधव यांनी थेट कोपरगाव पोलीस ठाण्यात धाव घेत लेखी फिर्याद दाखल केली असून संबंधित स्वयंघोषित पत्रकार विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणावरून आता तथाकथित डिजिटल पत्रकारांच्या वाढत्या सुळसुळाटाचा आणि त्यांच्याकडून होणाऱ्या ब्लॅकमेलिंगचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. फिर्यादी अजय जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळगाव थडी येथील मतीन बाबुलाल शेख याने गेल्या काही दिवसांपासून त्यांना सातत्याने फोन व व्हॉट्सॲप कॉल करून लक्ष्य केले. "तुझे वाळू वाहतुकीचे फोटो आणि व्हिडिओ माझ्याकडे आहेत. तुझ्याविरोधात तहसीलदारांकडे तक्रार करीन, बातम्या लावीन," अशी भीती दाखवून संशयिताने २० हजार रुपयांची मागणी केली. धक्कादायक बाब म्हणजे, कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी मागितलेल्या या २० हजार रुपयांच्या रकमेसाठी आरोपीने "२० शेळ्या" असा सांकेतिक शब्द वापरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.जाधव यांनी पैसे देण्यास नकार देताच, संबंधित व्यक्तीने सोशल मीडियावर त्यांच्याविरोधात बातम्या प्रसारित करण्यास सुरुवात केली. त्यानंतरही दबाव तंत्र सुरूच ठेवत, "आता तुला पैसे द्यावेच लागतील, नाहीतर तुझ्यावर कारवाई करीन. तुझा ट्रॅक्टर पलटी करून टाकू किंवा तुझ्यावर हल्ला घडवून आणू," अशी थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप तरुण शेतकऱ्याने केला आहे. या सर्व संभाषणांचे कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचा दावा फिर्यादीने केला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या घटनेच्या निमित्ताने कोपरगाव तालुका आणि परिसरात सध्या गल्लोगल्ली सुरू झालेल्या कथित YouTube न्यूज चॅनेल्सचा आणि पोर्टलचा काळा चेहरा समोर आला आहे. कोणतीही अधिकृत पार्श्वभूमी, पत्रकारितेचे नियम माहीत नसलेले अनेक जण हातात मोबाईल आणि गळ्यात ओळखपत्र अडकवून स्वतःला पत्रकार' म्हणवून घेत आहेत. काहींनी तर प्रेस नावाचे बोगस ओळखपत्र विक्रीचा धंदाच सुरू केला आहे. त्यामाध्यमातून अधिकारी, व्यावसायिक, शेतकरी आणि सर्वसामान्यांना किरकोळ कारणावरून किंवा खोट्या बातम्यांची भीती दाखवून हे कथित पत्रकार जाळ्यात ओढतात. कॅमेरा आणि सोशल मीडियाच्या ताकदीचा गैरवापर करून 'बातमी लावतो' अशी धमकी देणे आणि पडद्यामागून तोडपाणी करणे, हा काहींचा मुख्य व्यवसाय बनला आहे.अशा तोतया आणि ब्लॅकमेलर्समुळे अहोरात्र प्रामाणिकपणे काम करणाऱ्या आणि समाजाला न्याय मिळवून देणाऱ्या खऱ्या, अधिकृत पत्रकारांची नाहक बदनामी होत आहे.वाळूविषयक बातम्यांच्या माध्यमातून दबाव टाकून पैशांची मागणी झाल्याचा हा आरोप आता पोलीस तपासाच्या केंद्रस्थानी आहे. या प्रकरणातील सत्यता पोलीस तपासानंतर समोर येईलच; मात्र अशा प्रकारे पत्रकारितेच्या आडून खंडणी मागणाऱ्या प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे. जर कोपरगाव तालुका किंवा परिसरात कोणत्याही तोतया पत्रकाराने, YouTube चॅनेलच्या प्रतिनिधीने तुम्हाला बातमीची किंवा कारवाईची धमकी देऊन पैशांची मागणी केली, तर अशा ब्लॅकमेलिंगला अजिबात बळी पडू नका. अशा लोकांविरोधात तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात ऑडिओ/व्हिडिओ पुराव्यांसह तक्रार नोंदवा, असे आवाहन कोपरगाव तालुका पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी केले आहे.